मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | » शनिवार, २४ मे २०२५ | » वर्ष: १ » अंक:१ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## विदर्भात राष्ट्रवादी स्वबळावर

नागपूर, दि. २३ प्रतिनिधी

आगामी नागपूर महानगरपालिका निवडणुकांसह सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी राष्ट्रवादी काँग्रेसने सुरू केली आहे. शुक्रवारी नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या विदर्भस्तरीय परिषदेच्या माध्यमातून या मोहिमेची औपचारिक सुरूवात झाली. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला विदर्भातील सर्व माजी आमदार, खासदार, पदाधिकारी आणि प्रमुख नेते उपस्थित होते. या बैठकीत बोलताना प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केले की, विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर निवडणुकीची तयारी करणार आहे. त्यासाठी जून आणि जुलै महिन्यात ११ही जिल्ह्यांत बैठका घेण्यात येणार आहेत. नागपूरच्या बैठकीत प्रत्येक जिल्ह्याचे प्रमुख पदाधिकारी सहभागी झाले असून निवडणुकीच्या दृष्टिकोनातून याला प्रारंभिक बैठक मानले जात आहे.

अग्रलेख

## खरीखरी

## मातृत्वाची सर्वोच्च पूजा

आपले सर्वोच्च न्यायालय खरोखरच सर्वोच्च आहे. आजच्या त्यांच्या निर्णयावरून खरोखर असेच वाटते. महिलांच्या बाबतीत राजकारणी समाजकारणी, सत्ताकारणी आणि समाजकारणी सर्वच जण बेंबीच्या देठापासून ओरडत असतात. पण पुरुष आणि महिला यांच्या बाबतीत केला जाणारा भेदभाव काही कमी होत नाही. आधी चित्रपटाचीच गोष्ट घ्या. नायकापेक्षा नायिकेला मिळणारा मेहनताना म्हणजेच रॉयल्टी किंवा मानधन अर्ध्यापेक्षाही कमी असते. महिला कामावर असताना त्यांना काही सवलती आणि त्यांच्यावर थोडीशी कृपा म्हणून त्यांना काही सुविधा देण्यात येतात. स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळची माता आहे. हे सुभाषित आचार्य अत्रे यांनी आपल्या लेखनातून निर्मलारूपी पात्राकडून आणि नाटकामधून वदवून घेतलेले आहे. आपल्या पुरुषप्रधान समाजाची मानसिकता महिला जेव्हा मातृत्वाच्या उंबरठ्यावर असते. तेव्हाही पुरुषी अहंकाराचीच निदर्शक असते. हे बऱ्याच वेळेला दिसून आले आहे. आपण संबंधित महिलेला ज्या काही सुविधा देतो. ती आपली मेहरबानी आहे. असे सुविधा देणाऱ्यांना वाटते. वर्षानुवर्ष म्हणा किंवा प्राचीन काळापासून म्हणा. ही पुरुषी मानसिकता दृष्टोउत्पत्तीस आलेली आहे. गर्भवती महिलेला ज्या अवस्थेमध्ये विशेष सुविधा देण्याची गरज असते. त्यासाठी सरकारने कायदे करून त्याबाबत बारा आठवडे भर पगारी रजा मान्य केलेली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तीच रजा 26 आठवडे केलेली होती. अगदी दत्तक घेतलेल्या मुलासाठी सुद्धा 12 आठवड्यांची रजा आजकाल मंजूर आहे. ही रजा म्हणजे आम्ही वर म्हटल्याप्रमाणे मेहरबानी आहे. असे आपल्या पुरुषप्रधान समाज व्यवस्था आणि सत्तेला वाटत होते. आज सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठाचे न्यायमूर्ती अभय ओक आणि उज्वल भुईयां यांच्या खंडपीठाने महिलांना ही रजा देणे. हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. असा न्यायादेश देऊन महिलांना त्यांच्या हक्काची ग्वाहीच दिलेली आहे. प्रसूतीपूर्व काळामध्ये ज्या काही दक्षता घेण्यात येतात. त्याचे महत्त्व निश्चितच आहे. पण प्रसूतीनंतर पहिले काही महिने बाळाच्या संगोपनासाठी काही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. त्यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्या बाळाला त्याच्या मातेकडून दुग्धपान करणे अत्यंत गरजेचे असते. या सर्व बाबींचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने महिलांच्या हक्काची सनदच प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाची याबाबतीत करावी तेवढी प्रशंसा कमीच होईल. परवाच न्यायमूर्ती अभय ओक यांच्या मातोश्रींचे निधन झाले आणि त्यांनी आपल्या मातोश्रींना ममतेच्या ममत्वभावाची, आज जी काही भावपूर्ण श्रद्धांजली वाहीली आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केलेच पाहिजे. हा न्यायादेश किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा निर्णय सुवर्णाक्षरांनी लिहिण्याचा आहे. तसेही भारताने जे जे अधिकार महिलांना दिलेले आहेत. ते तथाकथित पुढारलेल्या देशांपेक्षा खूप आधी दिलेले आहेत. जगातील अनेक पुरोगामी, पुढारीपण करणाऱ्या आणि सुधारणावादी राष्ट्रांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. त्यामध्ये भारताची अनेक पश्चिमात्य देशांच्या आधीच आघाडी होती. भारताने स्त्री-पुरुष असा कोणताही भेदभाव किंवा लिंगभेद न करता भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर मतदानाचा अधिकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संविधानात हे कलम घातल्यामुळे किती मोठी भरारी महिलांना घेता आली. ते आपण पाहतोच आहोत. आता तर सैन्यात मोठमोठ्या पदावर महिलाच आहेत. हे सर्व होत असताना महिलांना प्रसूती काळाची रजा हा आपला हक्क आहे, असे कुठेही म्हणण्यात आले नव्हते. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठात आज जे झाले आहे. ते मातृत्वाला अभिवादन करण्यासारखे आहे. त्याबद्दल न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती उज्वल भुईयां यांच्या खंडपीठाला अगदी मनापासून धन्यवाद! धन्यवाद!! धन्यवाद!!!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# मातृत्व रजा ही केवळ सुविधा नाही तर तो महिलांचा हक्कच - सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था

**तामिळनाडूतील एका महिला सरकारी शिक्षिकेने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी महत्वाचा निर्णय दिला. त्यानुसार मातृत्व रजा ही मातृत्व लाभाचा अविभाज्य घटक असून महिलांच्या पुनरुत्पादक हक्कांचा अत्यावश्यक भाग आहे, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती अभय एस. ओक आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भूइयां यांच्या खंडपीठाने असे नमूद केले की कोणतीही संस्था महिलेला तिच्या मातृत्व रजेच्या हक्कापासून वंचित करू शकत नाही.**



तामिळनाडूतील महिला सरकारी शिक्षिकेने आपल्याला दुसऱ्या लग्नानंतर झालेल्या बाळाच्या जन्मानंतर मातृत्व रजा नाकारण्यात आल्याची तक्रार केली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय ऐतिहासिक मानला जात आहे.

तामिळनाडूतील महिलेने आपल्या याचिकेत म्हटले होते की, पहिल्या लग्नातून तिला दोन मुले असून राज्याच्या नियमांनुसार फक्त दोन मुलांपर्यंतच मातृत्व लाभ दिला जातो. मात्र, ती म्हणाली की पहिल्या दोन मुलांसाठी तिने कोणतीही मातृत्व रजा किंवा लाभ घेतले नव्हते. शिवाय, ती दुसऱ्या लग्नानंतरच सरकारी सेवेत दाखल झाली होती.

या प्रकरणात महिला शिक्षिकेच्या वतीने वकिल के. व्ही. मुथुकुमार यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, राज्य सरकारचा निर्णय तिच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा आहे, कारण तिने यापूर्वी मातृत्व लाभ घेतलेले नव्हते.

सर्वोच्च न्यायालयाने तिच्या बाजूने निर्णय देत मातृत्व लाभाच्या कक्षेत वाढ केली आणि मातृत्व रजा ही मूलभूत पुनरुत्पादक हक्काचा भाग असल्याचे घोषित केले. दरम्यान, २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मातृत्व लाभ अधिनियमात महत्त्वपूर्ण दुरुस्त्या करण्यात आल्या होत्या. त्यानुसार मातृत्व रजा १२ आठवड्यांवरून २६ आठवड्यांपर्यंत वाढवण्यात आली.

दत्तक मुलं स्वीकारणाऱ्या महिलांनाही १२ आठवड्यांची मातृत्व रजा मिळण्याचा अधिकार आहे. याआधीही सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये मातृत्व रजेला महिलांचा हक्क असल्याचे अधोरेखित केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की, महिलांना त्यांच्या नोकरीच्या स्वरूपावर अवलंबून न ठेवता मातृत्व रजा देणे हा त्यांचा हक्क आहे.

# नक्षल्यांचे घातपाताचे मनसुबे उधळले

## चकमकीत चार नक्षलवादी ठार

गडचिरोली, दि. २३ प्रतिनिधी

गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुका आणि छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती भागातील जंगलात पोलिसांशी झालेल्या चकमकीत आज ४ जहाल नक्षलवादी ठार झाले. यात २ पुरुष आणि २ महिलांचा समावेश आहे. हे नक्षलवादी उपकमांडर दर्जाचे असल्याची प्राथमिक माहिती आहे.

दोन महिन्यापूर्वीच भामरागड तालुका व छत्तीसगड सीमेवर कवंडे गावात गडचिरोली पोलिसांनी पोलिस मदत केंद्र सुरु केले. त्या परिसरात नक्षलवादी दबा धरुन असल्याचे कळताच अतिरिक्त पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वात सी-६० पथकाचे ३०० जवान आणि केंद्रीय राखीव दलाची एक तुकडी गुरुवारी दुपारी कवंडे आणि नेलगुंडा येथून इंद्रावती नदी परिसरात रवाना केली होती.



दरम्यान, आज सकाळी नक्षल्यांनी पोलिसांवर गोळीबार केला. पोलिसांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले. जवळपास दोन तास गोळीबार सुरु होता. त्यानंतर घटनास्थळाची पाहणी केली असता ४ जहाल नक्षल्यांचे मृतदेह सापडले. त्यात दोन महिला व दोन पुरुषांचा समावेश आहे. शिवाय एक स्वयंचलित रायफल, एक ३०३ रायफल, एक भरमार बंदूक, वॉकीटॉकी व अन्य साहित्य पोलिसांच्या हाती लागले आहे. यातील मृत उपकमांडर दर्जाचे असल्याचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले. लवकरच मृत नक्षल्यांची ओळख पटविली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

२१ मे रोजी छत्तीसगड पोलिसांनी माओवाद्यांचा देशातील सर्वोच्च नेता नंबाला केशव राव उर्फ गगन्ना याच्यासह २७ नक्षल्यांना कंठस्नान घातले होते. त्यानंतर घाबरलेल्या नक्षल्यांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घेण्याच्या हालचाली सुरु केल्या होत्या. त्या अनुषंगानेच हे नक्षली कवंडे भागात आले. मात्र, गडचिरोली पोलिसांनी त्यांचा खात्मा केला.

मागील तीन दिवसांपासून कवंडे आणि छत्तीसगडच्या सीमावर्ती परिसरात जोरदार पाऊस पडत आहे. अशा भर पावसात गडचिरोली पोलिसांनी नक्षलविरोधी अभियान राबवून मोहीम फत्ते केली. यामुळे घातपात करण्याचे नक्षल्यांचे मनसुबे उधळले गेले.

# अन्न व नागरी पुरवठा खाते पुन्हा भुजबळांच्याकडे

मुंबई, दि. २३ प्रतिनिधी

नुकतीच मंत्रिपदाची शपथ घेतलेले राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना अखेर खात्याची जबाबदारी मिळाली आहे. शिंदे सरकारमध्ये त्यांच्याकडेच असलेले परंतू, मध्यंतरी धनंजय मुंडेंकडे फिरून आलेले अन्न व नागरी पुरवठा खाते पुन्हा भुजबळ यांच्याकडे आले आहे.

छगन भुजबळ हे मंगळवारी मंत्रिपदाची शपथ घेतील असे सोमवारी सायंकाळी सांगण्यात आले होते. मुंडे यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा खाते होते. तेच खाते भुजबळ यांच्याकडे दिले जाईल असे कयास बांधले जात होते. हे खाते मुंडेंना राजिनामा द्यावा लागल्याने अजित पवारांकडे होते. राज्यात भाजप-शिंदेसेना आणि अजित पवार गटाचे सरकार आल्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या विस्तारावेळी भुजबळ यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली नव्हती. तेव्हापासून ते नाराज होते. आपली नाराजी त्यांनी अनेकदा बोलून दाखविली होती. भुजबळ हे अजित पवार गटातील एक मोठा ओबीसी चेहरा मानले जातात. यामुळेच येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भुजबळांना जवळ करण्यात आले आहे.



खातेवाटप झाल्याचा फोन येताच भुजबळ लगेचच मुंबईला रवाना झाले आहेत. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना भुजबळ म्हणाले की, सरकारी आदेश निघाल्याचे मला आताच कळले. मी लगेचच मुंबईला जात असून चार्ज घेत आहे. खात्याच्या सचिव, अधिकाऱ्यांची बैठक घेणार असून त्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यात येणार आहे. हे माझेच खाते होते. मंत्रिमंडळात समावेश न झाल्याने ते धनंजय मुंडे यांच्याकडे गेले होते. ते पुन्हा माझ्याकडे आले आहे. मी मंत्री असताना शेवटच्या गावापर्यंत, प्रत्येक दुकानात अन्य धान्य पोहोचवले होते, पुढे घोटाळा होऊ नये यासाठी प्रयत्न असणार आहेत, अशी प्रतिक्रिया भुजबळ यांनी दिली.


# अंमली पदार्थांच्या प्रकरणात पोलीस सापडल्यास थेट बडतर्फ - मुख्यमंत्री

सांगली,दि. २३ प्रतिनिधी

अंमली पदार्थांच्या कनेक्शनमध्ये पोलीस आढळून आल्यास आता निलंबन नाही. तर थेट सेवेतून बडतर्फ करण्यात येईल, असा गर्भित इशारा देत राज्यात अंमली पदार्थ झिरो टॉलरन्स मोहीम राबिण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगलीत केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार विशाल पाटील, आमदार जयंत पाटील, आमदार विश्वजित कदम, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सुरेश खाडे आदी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, राज्यात जवळपास दोन लाख पोलीस आहेत. पण त्यांच्या निवासस्थानाची संख्या अत्यंत कमी होती. त्यामुळे गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रात सातत्याने प्रयत्न करून गृहनिर्माण योजनेचे काम पूर्ण केले आहे. ९४ हजार घरे राज्यात तयार करण्यात आली आहेत. राज्यात पूर्वी पोलीस राहत असणाऱ्या ठिकाणी आंघोळीची देखील सोय नव्हती. आता अतिशय चांगल्या प्रतीचे बांधकाम असलेली घरे करण्यात आलेला आहे.

# वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण

## सुशील आणि राजेंद्र हगवणेंना अटक



पुणे, दि. २३ प्रतिनिधी

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात फरार असलेले राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे यांना आज पहाटे अटक झाली आहे. बावधन पोलिसांकडून ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. स्वारगेट परिसरातून त्यांना अटक करण्यात आली आहे. हगवणे पिता-पुत्राला आज दुपारी न्यायालयात हजर केले. तत्पूर्वीच, दुपारी भाजप महिला आघाडीने कोर्ट परिसरात धाव घेत हगवणेंच्या विरोधात घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन केले. तेव्हा त्यांच्या अंगावर टोमॅटो फेकण्याचा प्रयत्न झाला. दरम्यान, या पिता-पुत्रास ५दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पहाटे ४.३० वाजता ही कारवाई करण्यात आली आहे. हे दोघेही गेल्या सात दिवसांपासून फरार होते. त्यांच्या तपासासाठी पोलिसांची चार पथके रवाना करण्यात आली होती. त्यानंतर आज या दोघांना अटक करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे राज्य कार्यकारिणी सदस्य राजेंद्र हगवणे यांच्या सुनेने गळफास घेऊन जीवन संपवले; मात्र सुनेच्या अंगावर मारहाणीचे व्रण असल्यामुळे सासरच्यांनी तिचा खून केल्याचा आरोप माहेरच्यांनी केला आहे. गेल्या सात दिवसांपासून राजेंद्र हगवणे आणि मुलगा सुशील हगवणे हे दोघे फरार झाले होते. आज (शुक्रवारी) या दोघांना अटक करण्यात आली आहे. अटके आधी जेवतानाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. तर वैष्णवीची सासू, नवरा आणि नणंद यांना पोलिसांनी आधीच अटक केली आहे. समोर आलेल्या सीसीटीव्हीमध्ये राजेंद्र हगवणे आणि सुशील हगवणे हे दोघे तळेगाव मधील एका हॉटेलमध्ये मटणावर ताव मारतानाचा व्हिडिओ समोर आलेला आहे. आज पहाटे साडेचार वाजता अटक केलेले आहे. दरम्यान ते अशा प्रकारे मोकाट फिरत असताना पोलिसांच्या हाती लागले नाहीत का? पोलिसांनी कसा तपास करत होते, असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. पहाटे साडेचार वाजताच्या सुमारास पोलिसांनी हगवणे पितापुत्राला बेड्या ठोकल्या. पहाटेच्या सुमारास सापळा रचून पोलिसांनी ताब्यात घेतले.

> राजेंद्र आणि सुशील हगवणे यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी योग्य कारवाई केली आहे. पुढेही हे प्रकरण लॉजिकल एंडला नेण्यासाठी जे करायचं आहे ते पोलीस करतील. अशा प्रकारे छळ करुन आत्महत्येसाठी प्रवृत्त करणं या गोष्टी सहन केल्या जाणार नाही. जी कठोरातली कठोर कारवाई आहे ती केली जाईल.
>
> **- मुख्यमंत्री फडणवीस**

# 22 जूनपासून हुंडाबळी व हिंसामुक्त महाराष्ट्र चळवळ राबविणार - सुप्रिया सुळेंची घोषणा

पुणे, दि. २३ प्रतिनिधी

पुण्यातील वैष्णवी कस्पटे – हगवणे या २३ वर्षीय महिलेने सासरच्या छळाला कंटाळून १६ मे रोजी आत्महत्या केली. मृत्यूप्रकरणाचा पोलिसांकडून तपास सुरू असून हगवणे कुटुंबातील सदस्यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेवर प्रतिक्रिया देत असताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्यात पुन्हा एकदा हुंडामुक्तीसाठी चळवळ उभी करण्याची गरज व्यक्त केली होती.

शिकलेले लोकही चुकीचे वागत असून समाजात जागृती निर्माण करण्याची नव्याने आवश्यकता असल्याचे त्या म्हणाल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांनी आता “हुंडामुक्त महाराष्ट्र – हिंसामुक्त कुटुंब, जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा”, या अभियानाची घोषणा केली आहे.

सुप्रिया सुळे यांनी एक्सवर पोस्ट करत या अभियानाची माहिती दिली. २२ जून २०२५ पासून राज्यव्यापी अभियान राबविणार असल्याचे त्या



म्हणाल्या. “महाराष्ट्राची लेक स्व. वैष्णवी कस्पटे – हगवणे हिचा अतिशय वेदनादायक पद्धतीने हुंडाबळी झाला ही घटना मनाला प्रचंड वेदना देणारी घटना आहे. ज्या राज्याने स्त्री-मुक्तीच्या दृष्टीने देशाला दिशा दाखविण्याचे काम केले तेथे वैष्णवी सारख्या लेकीचा बळी जाणे हे अतिशय संतापजनक आहे. कोणत्याही संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारे आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र आज सुन्न झाला आहे. त्यासाठी केवळ संताप आणि दुःख व्यक्त करून भागणार नाही तर जोरदारपणे कृतिशील जागृतीचे पाऊल उचलावे लागेल.”

त्यामुळेच येत्या २२ जून २०२५ पासून राज्यात हुंडाबळी व हिंसामुक्त महाराष्ट्रासाठी लढा उभारण्याचा निर्धार करतो आहोत”, असे सुप्रिया सुळे आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या.

# रिझर्ह बँकेकडून 2.68 लाख कोटी रुपयांचा लाभांश

नवी दिल्ली दि. २३ वृत्तसंस्था

मोदी सरकारला रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून 2.68 लाख कोटी रुपयांचा लाभांश जाहीर करण्यात आला आहे. गेल्या वर्षी मध्यवर्ती बँकेकडून केंद्राला २.१ लाख कोटी रुपयांचा विक्रमी लाभांश दिला होता. रुपया स्थिर ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून मोठ्या प्रमाणात अमेरिकन डॉलर्सची विक्री केली आहे. अशातच या विक्रीतून चांगले उत्पन्न आले आहे. तसेच लिक्विडीटी ऑपरेशन्स अंतर्गत बँकांना मोठ्या प्रमाणात निधी दिल्यानंतर त्याबदल्यात व्याजाच्या स्वरुपात आरबीआयला नफा झाला आहे.

# ज्योती व्हिडीओ पब्लिश करण्याआधी पाकिस्तानी अधिकाऱ्याला पाठवायची

नवी दिल्ली दि. २३ वृत्तसंस्था

पाकिस्तानसाठी हेरगिरी करत असल्याच्या संशयावरून अटक करण्यात आलेल्या ज्योती मल्होत्राच्या चौकशीत धक्कादायक माहिती उघड झाली आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, ती सोशल मीडियावर पाकिस्तानशी संबंधित व्हिडीओ पोस्ट करण्याआधी ते व्हिडीओ दिल्लीतील पाकिस्तानी दूतावासातील अधिकारी दानिश याला पाठवत होती.



दानिश ज्योतीने पाठवलेले हे व्हिडीओ बघायचा आणि या व्हिडिओंचे परीक्षण करून त्यातील संवेदनशील किंवा पाकिस्तानच्या सुरक्षेशी संबंधित माहिती वगळण्याचा सल्ला द्यायचा. त्यानंतर ज्योती व्हिडीओ एडिट करून सोशल मीडियावर पोस्ट करत असे. तपास अधिकाऱ्यांच्या मते, हा एक योजनाबद्ध प्रचाराचा भाग असून पाकिस्तानच्या प्रतिमेला सांभाळत, भारतात सामाजिक तेढ निर्माण करण्याचा हेतू यामागे असू शकतो.

तपासादरम्यान ज्योतीच्या मोबाईलमध्ये व्हिडीओ पाठवण्याचे स्पष्ट पुरावे पोलिसांना मिळाले आहेत. याशिवाय, तिच्या चार बँक खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संशयास्पद आर्थिक व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. तपास यंत्रणा या आर्थिक व्यवहारांचा संबंध कोणत्याही परदेशी आर्थिक नेटवर्कशी आहे का, हे तपासत आहेत. सध्या ज्योतीच्या वतीने कोणत्याही वकिलाची नियुक्ती करण्यात आलेली नाही. तिचे वडील, हरीश मल्होत्रा यांनी सांगितले की, "वकील करण्यासाठी आमच्याकडे आर्थिक पाठबळ नाही. गेल्या काही दिवसांत शेजारी आणि नातेवाईक देखील आमच्याशी संपर्क टाळत आहेत." तपास यंत्रणा सध्या ज्योतीच्या ट्रॅव्हल पॅटर्न्सचा अभ्यास करत असून, तिने प्रवास केल्यानंतर संबंधित भागांमध्ये घडलेल्या दहशतवादी घटनांशी तिच्या व्हिडीओ पोस्टिंगचा काही संबंध आहे का, याचा शोध घेत आहेत. विशेषतः, या प्रवासांचे आर्थिक प्रायोजक कोण होते? तिला आर्थिक मदत कोण देत होते? यासंबंधी तपास सुरू आहे.

# 1 जूनपर्यंत मान्सून मुंबईत दाखल होणार

पुणे, दि. २३ प्रतिनिधी

नैऋत्य 'मॉन्सून' केरळमध्ये पुढील दोन ते तीन दिवसांत दाखल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली आहे. दरम्यान दक्षिण कोकण आणि गोव्यालगत असलेल्या मध्य, पूर्व अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, ते सध्या स्थिर आहे. या दरम्यान महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढील तीन ते चार दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत मान्सून केरळात दाखल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. २५ मे पर्यंत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता वर्तवली आहे. मुंबईत साधारण १ जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे.



रायगड, रत्नागिरीमध्ये मेघगर्जना विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या दोन्ही जिल्ह्यांना 'रेड' अलर्ट देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्याच्या घाट विभागात तुरळक ठिकाणी विजांचा कटकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

वातावरण अनुकूल नैऋत्य मॉन्सून अरबी समुद्राच्या दक्षिण भागातील काही उर्वरित भागांमध्ये, मालदीव आणि कोमोरॅन क्षेत्राच्या उर्वरित भागांमध्ये, लक्षद्वीप, केरळ, कर्नाटक, तमिळनाडूच्या काही भागांमध्ये, तसेच दक्षिण-मध्य बंगालचा उपसागर, उत्तर बंगालचा उपसागर आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांमध्ये पुढे सरकण्यासाठी परिस्थिती अनुकूल होत आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्ये काही भागात अतिवृष्टीची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात देखील जोरदार पावसाचा अंदाज आहे. मुंबईत पावसाचा जोर कमी राहणार असून, यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईत वादळी वाऱ्यांसह हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. रायगडसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, अतिमुसळधार ते मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाने २२ ते २४ मे दरम्यान कोकण, गोवा आणि पश्चिम किनारपट्टीसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. विशेषतः मुंबई आणि परिसरात २३ मे रोजी संध्याकाळपासून पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे जलमय परिस्थिती आणि वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते. मुंबई महानगर प्रदेशासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट दिला गेला आहे.

## ➤ महत्त्वाचे

### खुटवडनगरमध्ये रस्ता कामात ठेकेदाराकडून झाडांच्या मुळ्यांचे नुकसान

**सिडको ।** प्रभाग क्रमांक २६ मधील खुटवडनगर येथे सुरु असलेल्या रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामात गंभीर निष्काळजीपणा समोर आला आहे. संबंधित ठेकेदाराने रस्त्यालगत असलेल्या अनेक झाडांच्या मुळ्या मुद्दाम उघड्या



ठेवलेल्या असून, त्यामुळे पावसाळ्यात ही झाडे कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सुमित शर्मा या वृक्षप्रेमीने सातपूर विभागीय कार्यालयाकडे तक्रार दाखल करत ही माहिती दिली. त्यानुसार, ठेकेदाराने झाडांची मुळे उघडी टाकून त्यांचे जीवनचक्रच धोक्यात आणले असून, हे सर्व मुद्दाम करून भविष्यात रस्ता रुंदीकरणासाठी झाड तोडण्याचा मार्ग मोकळा ठेवण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप करण्यात आला आहे. पावसाळ्याच्या तोंडावर ही झाडे पडल्यास नागरिकांचे जीव धोक्यात येऊ शकतात तसेच मालमत्तेचेही नुकसान होण्याची शक्यता आहे. यासोबतच पर्यावरणावरही परिणाम होणार आहे. नागरिक आणि पर्यावरणप्रेमी यामधून मनपावर रोष व्यक्त करत आहेत. तक्रारदाराने संबंधित झाडांच्या मुळ्यांना त्वरित मातीने झाकून सुरक्षित करावे, तसेच संबंधित ठेकेदारावर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेविषयी गंभीर दुर्लक्ष केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात महापालिकेने तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### अकरावी प्रवेश प्रक्रिया २६ मे पासून; ऑनलाईन नोंदणी

**नाशिक ।** यंदा राज्यभरात अकरावीचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार बुधवार (दि. 21) पासून विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी करणे व पसंतीक्रम नोंदणी सुरुवात होणार होती; मात्र नोंदणीसाठी संकेतस्थळ सुरूच न झाल्याने प्रवेश प्रक्रिया खोळंबली होती. अखेर शिक्षण संचालनालयाने याबाबत वेळापत्रक जाहीर करत ही प्रक्रिया २६ मे पासून सुरू होणार असल्याची कळविले आहे. त्यामुळे सर्वच फेऱ्या आपोआप पुऱ्या ढकलल्या गेल्या आहेत.

### बाल कामगाराची हॉटेलमधून सुटका

**नाशिक ।** दोन हॉटेल्सवर धाड टाकून दोघा बाल लकामगारांची सुटका नाशिकच्या कामगार उपयुक्त विभागाच्या पथकाने केल्याची माहिती सूत्रांनी दिली. कामगार उपायुक्त विकास माळी आणि सहाय्यक कामगार आयुक्त चंद्रकांत बिरार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली आहे. बुधवारी (तारीख 21) रोजी गुंजाळनगर येथील हॉटेल आणि कळवण रोडवरील हॉटेल येथे कारवाई झाली. गुंजाळनगर येथील बालकामगाराकडून टेबल पुसणे, पाणी देणे, साफसफाईचे काम करताना आढळून आले होते. तर कळवण रोड येथील हॉटेलमध्ये कार्यरत असलेल्या बालकामगाराकडून दारूची सेवा, साफसफाईचे कामे करून घेतली जात होती. दोन महिन्यापासून कोणतेही वेतन न घेता काम करत असल्याचे समजते. याबाबत पथकास माहिती मिळाली. पथकाने त्वरित कारवाई करून दोघा बालकामगारांची पोलिसांच्या मदतीने सुटका केली. या प्रकरणी हॉटेलमालकांवर बाल कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

### वाहतूक पोलिसांशी वाद घातल्याने गुन्हा दाखल

**नाशिक ।** गंगापूर रोडवरील विद्याविकास सर्कल येथे नो पार्किंगमध्ये पार्क केलेल्या वाहनावर शहर वाहतूक शाखेकडून टोईंगची कारवाई केली जात होती. यावेळी एका दुचाकीचालकाने वाहतूक पोलिसांशी हुज्जत घालत वाद घातला तसेच सोशल मीडियावर पोलिसांची प्रतिमा नवीन करणारी पोस्ट केली. या प्रकरणी गंगापूर पोलिसात सरकारी कामात अडथळा निर्माण करण्यासह पोलिसांची सोशल मीडियावर बदनामी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गोकुळ शंकर ढोमसे (वय 32, राहणार मखमलाबाद रोड) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. वाहतूक शाखाचे अंमलदार नितीन पांडुरंग हुल्लुळे (वय 45, राहणार आडगाव) यांच्या फिर्यादीनुसार हा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. नागरिकांनी तथा वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांशी वाद घालू नये, असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात आले आहे.

## ➤ छोट्या जाहिराती

### त्वरित हेल्पर पाहिजे

एजन्सीज्च्या कामासाठी हेल्पर मुले-मुली त्वरित पाहिजे. पगार मुलाखतीमध्ये सांगण्यात येईल. संपर्क- मो. 9422276684 । 8983548496. शिक्षणाची अट नाही.

# मुक्त विद्यापीठात प्रात्यक्षिक कार्यशाळा संपन्न

## शैक्षणिक- प्रशासकीय कार्य उत्कृष्टतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर





**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात 'शैक्षणिक-प्रशासकीय कार्य उत्कृष्टतेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए.आय.) वापर'विषयी प्रात्यक्षिक कार्यशाळा संपन्न झाली. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले.

विद्यापीठाच्या प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रातर्फे आयोजित या कार्यशाळा उदघाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, स्कूल ऑफ डिजीटल एज्युकेशनच्या संचालिका एमिरेटस प्रा. कविता साळुंके, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेचे प्रा, जयदीप निकम, प्रा. गणेश लोखंडे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम.के.सी.एल.) चे तज्ज्ञ श्रीमती रेवती नामजोशी, सौम्यारंजन पानी, अविनाश देशमुख, मोहसीन शेख यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी कुलगुरू म्हणाले की, येत्या काळात माहितीचा विदा (डाटा) आणि खनिज संपत्ती यांना सोन्यापेक्षा अधिक महत्व येणार आहे. आपल्याकडील माहिती – विदा किती समृद्ध आहे यावर आपल्या कामकाजातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए. आय.) वापर प्रभावी व उपयुक्त ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान व वापर माहित असणाऱ्या व्यक्तींनाच नोकरीच्या अधिक संधी व प्राधान्य प्राप्त होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता वापराचे जसे फायदे आहेत तशा त्याच्या काही मर्यादा देखील आहेत. त्या समजून घेतल्या पाहिजेत. एकूणच कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए. आय.) वापर हा चांगल्या व विधायक कामासाठी करण्याची जबाबदारी ही आपणा सर्वांची आहे. त्यासाठी चांगले तंत्रस्नेही व्हा, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी केले. यावेळी बोलतांना महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम.के.सी.एल.) च्या पुणे येथील श्रीमती रेवती नामजोशी म्हणाल्या की कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यापुढील शिक्षण हे अधिक संवादी व अनुभवावर आधारित असणार आहे. त्यात हे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांच्या भाव – भावना सांगू शकले तर शिक्षणात क्रांती होवू शकते, अशी पुष्टी त्यांनी जोडली. उदघाटन सत्रानंतर महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम.के.सी.एल.) चे तज्ज्ञ सौम्यारंजन पानी, रेवती नामजोशी, मोहसीन शेख यांनी उपस्थित सर्वांना चॅट जीपीटी, गुगल जेमिनी, डीपसीक आदी संगणकीय टूलच्या माध्यमातून मजकूर व पीपीटी निर्मिती, डिजाईन, मसुदा सारांश, पत्र व ईमेल आदींविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर दुपारसत्रात विद्यापीठाच्या गणित - संगणक प्रयोगशाळा व ज्ञान स्त्रोत केंद्र येथोल प्रयोगशाळेत अनुक्रमे विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, शैक्षणिक संयोजक व प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांचे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित मुलभूत प्रात्यक्षिक व प्रशिक्षण घेण्यात आले. प्रास्ताविक प्रा. कविता साळुंके यांनी केले. सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा. वसुदेव राऊत यांनी केले.

# अफलातून रंगतदार मैफलीत रसिक निघाले चिंब न्हाऊन!



**नाशिक ।** ब्लॅक बस्टर महाड्युएट्स अर्थात सुमधूर युगुलगीतांचा मुकाबला काल रसिकांनी अनुभवला. गायक - गायिकांच्या जोड्यांनी एकसे एक गाणी सादर केली. या अफलातून रंगतदार मैफलीत रसिक श्रोते चिंब न्हाऊन निघाले.

संतोष देहूकर आणि डी.एम.बोरसे आयोजित अफलातून म्युझिक लव्हर्स प्रस्तुत ब्लॅक बस्टर महाड्युएट्स अर्थात सुमधूर युगुलगीतांची मैफल गुरुवारी ( दि.२२) इंदिरानगर येथील स्वर्णिमा सभागृहात झाली. दीपक चौधरी, सीमा जाधव, प्रमोद कापडणे, प्रीती दीक्षित, मधुकर नाठे, सोनिया पाटील, देवनाथ राखल, पूर्णिमा गुप्ता, माऊली मुळे, भाग्यश्री गायधनी, राज अक्कर व संतोष देहूकर आणि किरण गोसावी, अनिल पांचाळ, प्रज्ञा गोपाळे, राजेश पाटील, सुगंधा शेलार या गायक - गायिकांच्या जोड्यांनी सुरेल गाणी गायली. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. लेकर हम दिवाना दिल...या युगुल गीताने मैफलीची सुरुवात झाली. पहेले पहेले प्यार की...,नाम गुम जायेगा..., धक धक करने लगा..., परबत के उस पार..., जय जय शिवशंकर..., राह में उनके..., तेरा फुलो जैसा रंग...,एक मैं और एक तू..., मुझसे जुदा होकार... या गाण्यांना रसिकांची खास पसंती मिळाली. गिरीशभाई ठक्कर यांनी निवेदनात अफलातून रंग भरले. हरिषभाई ठक्कर, अनिल पोटे, प्रकाश गोसावी यांचे विशेष सहकार्य लाभले. सुमधुर स्वरांमध्ये श्रोते चिंब भिजले.

# पाथर्डी फाटा परिसरात लवकरच महिला कामगारांसाठी वसतीगृह

## वस्तीगृहाच्या आराखड्यातील कामांची आ. हिरेंनी घेतली माहिती



**सिडको ।** अंबड आणि सातपूर येथील औद्योगिक वसाहतींमध्ये काम करणाऱ्या महिला कामगारांसाठी स्वतंत्र वस्तीगृहासाठीच्या आमदार सीमाताई हिरे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. वस्तीगृह उभारणीसाठी म्हाडा प्रशासनाने तयार केलेल्या आराखडयातील कामांची माहिती घेत लवकरात लवकर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना आ.हिरेंनी म्हाडा प्रशासनाला केल्या. होस्टेल उभारण्यासाठी नुकताच नाशिक महानगरपालिका प्रशासनाने म्हाडाला परवानगी दिली असून लवकरच वस्तीगृह उभारणीच्या प्रत्यक्ष कामाला प्रारंभ होणार असल्याची माहिती आ.हिरेंनी दिली आहेत.

महिला कामगारांसाठी स्वतंत्र असे वस्तीगृह असावे अशी मागणी महिला वर्गाकडून आ.हिरेंकडे सतत होत होती. यातूनच गेल्या वर्षभरापासून आ.हिरेंकडून प्रयत्न सुरू होते.याकामी आ.हिरेंनी वेळोवेळी म्हाडा प्रशासनाशी चर्चा केली करून महिला वस्तीगृहासाठी काही महिन्यांपूर्वी पाथर्डीफाटा परिसरातील पाचशे शेहत्तर स्क्वेअर मीटर जागा निश्चित करण्यात आली होती.याकामी मागील महिन्यात महानगरपालिकेकडून परवानगी साठीची ऑफीस कॉपी मंजूर करण्यात आली असून उभारण्यात येणाऱ्या बिल्डींगचा आराखडाही तयार करण्यात आला आहे. आज आ.हिरेंनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेत आराखडयातील कामांची माहिती घेतली.यावेळी म्हाडाचे मुख्याधिकारी शिवकुमार अवळकंठे, कार्यकारी अभियंता विहार बोडके, आर्किटेक विजय निकम आदी उपस्थितीत होते. वस्तीगृहाची संभाव्य इमारत पार्किंग अधिक सहा मजली असणार असून यात लिफ्टची व्यवस्था करण्यात येणार आहे.पहिल्या मजल्यावर स्वतंत्र वॉर्डन रूम, कॉम्प्युटर रूम, डायनिंग हॉल, मल्टीपर्पज हॉल, किचन, प्रतिक्षागृह, कॉमन टॉयलेट असणार आहे. दुसरा ते सहाव्या मजल्यावर प्रत्येकी टॉयलेट बाथरूमसह दहा रुम आणि पॅंट्री असणार आहे.इमारतीचे एकून बांधकाम तेराशे स्क्वेअर मिटर असणार असून प्रकल्पासाठी अंदाजे खर्च सव्वा आठ कोटी इतकी असणार असल्याची माहिती मुख्याधिकारी अवळकंठे यांनी आ.हिरेंना दिली.या कामाला लवकरच प्रशासकीय मान्यता मिळणार आहे. वस्तीगृह उभारणीसाठी लवकरात लवकर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना आ.हिरेंनी म्हाडा प्रशासनाला केल्या.

# भुजबळांच्या मंत्रीमंडळ समावेशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत होणार

## जि.प.चे माजी सदस्य गोरख बोडके यांचा दावा

**इगतपुरी ।** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचा पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये समावेश झाला आहे. यामुळे नाशिक जिल्हयात जल्लोषाचे वातावरण असून भुजबळ मंत्री झाल्याने विकासरथ तर वेगाने दौडेलच, या शिवाय जिल्हयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ही बळकट होईल, असा दावा माजी जि.प.सदस्य तथा रा.कॉ. चे प्रदेश चिटणीस गोरख बोडके यांनी केला आहे.

भुजबळ हे कायमपासूनच संघर्षशील नेते आहेत.अगदी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत जगण्याचा संघर्ष करणा-या भुजबळांनी मराठी माणसासाठी बाळासाहेब ठाकरे यांचे नेतृत्वात आक्रमक संघर्ष केला. मंडल आयोगाला शिवसेनेचा विरोध पाहुन बाळासाहेब ठाकरे यांनाच थेट शिंगावर घेण्याचे धाडस करत त्यांनी शिवसेना सोडली व शरद पवारांच्या सोबतीने त्यांनी राजकारण सुरु ठेवले. या काळात विविध मंत्रीपदे सांभाळत त्यांनी उप मुख्यमंत्री पदालाही गवसणी घातली होती. अत्यंत आक्रमक, स्पष्टवक्ते व तितकेच कणखर असलेले भुजबळांनी भल्या भल्यानां शिंगावर घेतले. नुकत्याच विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळुनही मंत्रीमंडळातून मात्र त्यांना वगळले गेले होते. त्यामुळे भुजबळ समर्थक मोठया प्रमाणात नाराज झाले होते.

# यशवंतराव चव्हाण सेंटर नाशिकच्या अध्यक्षपदी ॲड. नितीन ठाकरे

## सचिवपदी प्रा. डॉ. अशोक पिंगळे



**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण सेंटर,मुंबई यांच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस तथा नाशिक वकील संघाचे अध्यक्ष ॲड.नितीन ठाकरे यांची यशवंतराव चव्हाण सेंटर, नाशिकच्या अध्यक्षपदी तर डॉ. अशोक पिंगळे यांची सचिवपदी पुन्हा एकदा नियुक्ती झाली आहे.

या पदाचा कार्यकाल हा १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ पर्यंत असून, नवनियुक्त कार्यकारिणीत कोषाध्यक्ष म्हणून विक्रांत प्रकाश मते तर ॲड. राजेंद्र डोखळे, ॲड. मनिष लोणारी, अशोक गायकवाड (पालखेडकर), प्रा. सुरेखा बोऱ्हाडे, डॉ. विजया गायकवाड, डॉ. सुप्रिया मोरे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. यासोबतच विशेष निमंत्रित सदस्यपदी सौरभ टोचे यांची नियुक्ती झाली आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# डॉ. विलास पांगारकर यांचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सन्मान

**नाशिक ।** छावा मराठा संघटना, छावा माथाडी कामगार सेना व छावा भारत भारत क्रांती मिशनच्या माध्यमातून डॉ. विलास पांगरकर हे सामाजिक कार्य करत आहे. समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे.

कामगारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्यांना न्याय देण्यात ते यशस्वी ठरले आहे. त्याचप्रमाणे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, मा जिजाऊ, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्याची माहिती सर्वसामान्यांना व्हावी. त्याचप्रमाणे या महान पुरुषांचे कार्य नुसते महाराष्ट्र पुरते मर्यादित न राहता संपूर्ण देशभरात त्यांच्या कार्याची माहिती घ्यावी. यासाठी छावा



भारत क्रांती मिशनच्या माध्यमातून पांगरकर हे गेल्या पंधरा वर्षापासून विविध राज्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध राज्यात साजरी करत आहे. यावर्षी राजस्थानची राजधानी जयपूर येथे मोठ्या उत्साहामध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती करण्यात आली. यावेळी नाशिक येथील छत्रपती शिवाजी महाराजांची पुतळ्याची रथयात्रा ही नाशिक धुळे मध्य प्रदेश मार्गे राजस्थान येथे नेण्यात आली होती. यावेळी राजभवन येथे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले होते. यानंतर जयपूरच्या रस्त्यावरून भव्य अशी रॅली काढण्यात आली होती. यानंतर स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जयंती 18 मार्च रोजी वेरूळ येथे मालोजीराजे गडी येथे साजरी करण्यात आली होती. भारतातील पहिला धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वरूड पुतळा हा नाशिक येथे पांगरकर यांनी स्वखर्चातून बनवण्यात आला होता. हया पुतळ्याची राष्ट्रीय गौरव रथयात्रा ही नाशिक संभाजीनगर धुळे मध्य प्रदेश राजस्थान हरियाणा दिल्ली या चार राज्यातून काढण्यात आली. गेल्या तीन वर्षापासून दिल्ली येथे महाराष्ट्र सदन येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येत आहे. या कार्याची दखल घेत महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने पांगारकर यांचा धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्ताने महाराष्ट्र सदन येथे आयोजित कार्यक्रमात सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सुदर्शन न्युज चॅनलचे सुरेश चव्हाणके, शिवाजीराजे जाधवराव, अभिनेत्री वर्षा उसगावकर, प्रा. राजेश सरकटे, किशोर चव्हाण, राम नारायण आदी मान्यवर उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### वर्गीकरण केलेला कचराच घेणार

**नाशिक ।** नागरिकांनी ओला आणि सुका असा वेगळा केलेला कचरा घंटागाडी कर्मचाऱ्यांना द्यावा. वर्गीकरण न केलेला कचरा घेतला जाणार नसल्याचे महापालिकेने ठणकावून सांगितले आहे. याबाबत महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त



करिष्मा नायर यांनी गंभीर इशारा दिला असून, अंमलबजावणी न करणाऱ्या नागरिकांना कारवाईस सामोरे जावे लागणार आहे. प्रदीर्घ कालावधीपासून जनजागृती केल्यानंतरही नागरिकांकडून कचरा वर्गीकरण करण्यास टाळाटाळ केली जात आहे. अशा नागरिकांना महापालिका प्रशासन नोटिसा बजावत आहे. एक जूनपासून ओला व सुका कचरा असे वर्गीकरण केलेला नसल्यास घंटागाडी तो कचरा स्वीकारणार नसल्याचे सांगण्यात आले असून, याबाबत आर्थिक दंड बसावला जाणार असल्याने असल्याचे सूत्रांनी सांगितले. ओला आणि सुका कचरा वर्गीकरण हा प्रश्न जुना असून, याबाबत नागरिकांचेच सहकार्य आवश्यक असल्याचे नायर यांनी आवर्जून सांगितले आहे. स्वच्छ नाशिक सुंदर नाशिककरिता नागरिकांनी ही सवय अंगीकारावी असेही आवाहन त्यांनी केले आहे.

---

**कामगारांवरील अन्यायाविरोधातील विविध मागण्यांसाठी**

# ट्रॅक कंपोनंट्स लिमिटेड कंपनीच्या विरोधात साखळी उपोषण सुरू



**नाशिक ।** ट्रॅक कंपोनंट्स लिमिटेड या कंपनीत स्थानिक कामगारांवर अन्याय होत असून, विविध मागण्यांसाठी 'मार्शल' राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रणित संघटित- असंघटित कामगार युनियनच्या वतीने बुधवार, २१ मे २०२५ पासून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे.

कंपनीकडून कोणतीही पूर्वसूचना न देता कामगारांना कामावरून कमी केले जाते. बोनस वितरणात अपहार होत आहे. कामगारांना कर्मचारी राज्य विमा योजनेंतर्गत ओळखपत्र दिले जात नाही. त्यांना वेतन पावती मिळत नाही. पगार वेळेवर न देता १५ ते २० तारखेनंतर दिला जातो. कामगारांकडून १२ ते १६ तास जबरदस्तीने काम करून घेतले जाते. रात्रपाळीनंतर लगेच पहिल्या पाळीत काम करायला लावले जाते. याशिवाय आठवड्याची नियमित सुट्टी तसेच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, २ ऑक्टोबर, १ मे या राष्ट्रीय सुट्ट्याही दिल्या जात नाहीत. अपघात झाल्यास कामगाराला खासगी रुग्णालयात पाठवून त्यानंतर कामावरून काढले जाते. कंपनीच्या ४० टक्के जागेत बेकायदेशीर अतिक्रमण करण्यात आले आहे. याशिवाय हाउसकीपिंगच्या परवान्याखाली यंत्रचालकांकडून काम करून घेतले जाते. कंपनी परिसरातील अनधिकृत वाहनतळ हटवण्यात यावे, बेकायदेशीर वृक्षतोडीबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा, सुरक्षा साहित्य न दिल्यामुळे कामगारांचा जीव धोक्यात येतो, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. संघटना स्थापन केल्यामुळे ज्या कामगारांना कामावरून काढण्यात आले आहे, त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांना न्याय मिळेपर्यंत हे साखळी उपोषण सुरू राहणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत सुंदर खरात यांनी स्पष्ट केले आहे.

---

# मंगल कार्यालयातून दागिने चोरी करणारा चोरटा अटकेत

**३.७८ लाखांचा मुद्देमाल जप्त**




**सिडको ।** सौभाग्य मंगल कार्यालय, पपया नर्सरी येथे २० मे रोजी विवाह समारंभात वधू पक्षाच्या खोलीतून सोन्या-चांदीचे दागिने चोरी करणाऱ्या चोरट्याला गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने अवघ्या दोन दिवसांत अटक केली. प्रशांत देवानंद राणे (वय ३४, रा. जुने धुळे, सध्या सातपूर, नाशिक) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

घटनेनंतर सातपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज तपासली. आरोपी मोपेडवर येऊन कार्यक्रमात सहभागी झाल्याचे निदर्शनास आले. तब्बल ४५ सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा मागोवा घेतला. गुप्त माहितीच्या आधारे आरोपी हा निमा हाऊस ते स्वारबाबानगर रस्त्यावर मोपेडसह येणार असल्याचे समजताच पोलिसांनी आयटीआयच्या मागे सापळा रचून त्याला शिताफीने अटक केली. झडती दरम्यान आरोपीकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली मोपेड असा एकूण ३,७८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कामगिरी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव आणि सहायक आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत तोडकर यांच्या नेतृत्वाखाली युनिट २ च्या पथकाने केली. तपासात तांत्रिक विश्लेषण विभागाचेही मोलाचे सहकार्य लाभले. आरोपीविरुद्ध सातपूर पोलिस ठाण्यात पुढील कारवाई सुरू आहे.

---

# नाशिकमधील शाहीस्नानाच्या तारखा होणार १ जूनला जाहीर

**सिंहस्थ कुंभमेळा २०२७ : मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आखाड्यांची बैठक**

**नाशिक ।** सन २०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तेरा आखाड्यांचे २६ प्रतिनिधी यांची बैठक १ जून रोजी नाशिकमध्ये होणार आहे.

या बैठकीत नाशिकमधील शाहीस्नानाच्या तारखा घोषित केल्या जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. २०२६-२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा भरणार आहे. त्र्यंबकेश्वर येथील आखाडे व पुरोहित संघातर्फे तेथील शाहीस्नानाच्या तारखा यापूर्वी जाहीर करण्यात आल्या; पण नाशिकच्या तारखा घोषित करण्यासाठी अद्याप मुहूर्त लागत नव्हता. त्यामुळे साधू-संतांमध्ये तीव्र नाराजी होती. याबाबत साधू महंतांनी ल आपली नाराजी प्रशासनाकडे व्यक्तही केली होती; परंतु कुंभमेळ्याच्या तयारीत गुंतलेल्या प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले होते. चालू महिन्याच्या प्रारंभी आखाडा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची हरिद्वार येथे बैठक पार पडली. बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करताना शाहीस्नानाच्या तारखा घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य शासनाला या निर्णयाची माहिती देतानाच लवकरच बैठक घ्यावी, अशी मागणी करण्यात आली होती अखेर आखाडा परिषदेच्या मागणीला मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहे.

नाशिकमध्ये मुख्यमंत्री फडणवीस आणि आकारा परिषदेचे २६ प्रतिनिधी स्थानिक साधुमहंत तसेच नाशिक आणि त्र्यंबकेश्वर पुरोहित संघाची बैठक पार पडणार आहे. या बैठकीच नाशिकमधील शाहीस्नानाच्या तारखा घोषित केल्या जाणार आहेत.

> कुंभ-मेळ्याच्या तयारी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आखाडा परिषदेच्या प्रतिनिधींची एक जूनला बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत नाशिक मधील शाहीस्नानाच्या तारखांची घोषणा केली जाईल. त्यामुळे कुंभमेळ्याचे नियोजन स्पष्ट होईल.
>
> **– महंत भक्तीचरणदास महाराज, प्रवक्ता, अखिल भारतीय आखाडा परिषद, नाशिक**



---

### सोमवारपासून नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धा

**नाशिक ।** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखा आयोजित अनंत कुबल राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेला सोमवारपासून दिनांक २६ रोजी प्रारंभ होत आहे. दिनांक २६ ते ३० दरम्यान चालणाऱ्या या स्पर्धा महाकवी कालिदास कला मंदिरात होणार आहेत. या स्पर्धेत एकूण २४ एकांकिका सादर केल्या जाणार आहेत. मागील वर्षी स्पर्धेत २० एकांकिका सादर झाल्या होत्या. यंदाचे स्पर्धेचे बारावी वर्षे आहे. स्पर्धेचा उदघाटन सोहळा दि. २६ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये होणार असून, पारितोषिक वितरण दि. ३० रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

---

# सीएसआर निधीबाबत पारदर्शकता हवी



**नाशिक ।** सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधीच्या वापराबाबत पारदर्शकता आणण्याची मागणी महाराष्ट्र एनजीओ समितीच्या वतीने करण्यात आली. यामागे शैक्षणिक संस्था, खासगी कंपन्या, स्वयंसेवी संस्थांमार्फत सामाजिक कार्यात प्रभावी बदल घडवून आणण्याचा उद्देश असल्याचे समितीतर्फे सांगण्यात आले.

शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचनेप्रमाणे, शैक्षणिक संस्थांनी सीएसआर निधीच्या योग्य वापरासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा. त्यामुळे निधीचा विनियोग योग्य पद्धतीने होईल असे समितीचे म्हणणे आहे.महाराष्ट्रात वार्षिक सुमारे १६ कोटी सीएसआर निधी खर्च होतो. मात्र, हा निधी खरोखर कुठे वापरला जातो याबाबत माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे राज्यस्तरीय चौकशी समिती स्थापन करून निधीचा विनियोग तपासावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. महाराष्ट्रात ५ हजार८०९ कंपन्यांमार्फत अंदाजे ५ हजार ४९७ कोटी ३ लाख रुपयांचा सीएसआर निधी उपलब्ध आहे. त्यापैकी नाशिक जिल्ह्यातच २०१८ ते २०२४ या सहा वर्षांत ३५ हजार ०९७.४५ कोटी रुपये खर्च झाल्याचा दावा समितीने केला. मात्र, या निधीचा प्रत्यक्ष उपयोग कुठे झाला, हे आजही स्पष्ट नाही. सीएसआर निधीचा योग्य वापर करून तो गरजूंना मिळावा आणि सामाजिक संस्था सक्षम व्हाव्यात, हाच महाराष्ट्र एनजीओ समितीचा मुख्य हेतू आहे. यासाठी शासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी ठाम भूमिका समितीने पत्रकार परिषदेत मांडली.

---

# अंबड परिसरात अपघात, गुन्ह्यांची मालिका सुरूच

**सिडको ।** अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक २२ मे २०२५ रोजी विविध स्वरूपाचे सात गंभीर गुन्हे व दोन मृत्यूच्या घटना घडल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे व अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. यात एटीएम फोडून मोठ्या प्रमाणात रोख चोरी, अपघात, मारहाण, धमकी, व अपघाती मृत्यू अशा घटना समाविष्ट आहेत. संबंधित घटनांवर अंबड पोलीस ठाणे व त्यांच्या उपचौक्यांमार्फत तपास सुरु आहे.

पहिल्या घटनेत भाविका महेश खत्री (वय 33, शिक्षिका) यांना मोंढे हॉल जवळ, उत्तमनगर येथे एका स्प्लेंडर मोटारसायकलवरून आलेल्या अनोळखी युवकाने भरधाव वेगात धडक दिली. या अपघातात त्यांच्या पायाला गंभीर इजा झाली. जेव्हा त्यांनी नुकसानभरपाईची मागणी केली, तेव्हा त्या युवकासोबत असलेल्या मित्रांनी त्यांना व त्यांच्या बहिणीला शिवीगाळ केली व दमदाटी केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरु आहे.

अल्फा इंजिनिअरिंग कंपनीत बेकायदेशीरपणे घुसून १५ जणांच्या गटाने सिक्युरिटी गार्डला धक्काबुक्की करत " माथाडी एक्सपोर्ट व जनरल कामगार युनियन" या नावाचा बोर्ड कंपनीच्या गेटवर लावून कामगारांना जबरदस्तीने सामील होण्यासाठी धमकावले. फिर्यादी विलास वाघमारे यांच्या तक्रारीवरून विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे. दोन अपघाती मृत्यूंची नोंदही अंबड पोलीस ठाण्यात झाली. यातील पहिल्या घटनेत सतिश सुभाष सोनवणे (वय 41, रा. सिडको) यांना छातीत दुखू लागल्याने श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी मृत घोषित केले. दुसऱ्या मृत्यूच्या घटनेत आकांक्षा काकमल सिंग (वय 19, रा. दामोदर नगर) हिचा 2 मे रोजी अंबडगाव येथे अपघात झाला होता. गाडी घसरून पडल्याने पोटाला गंभीर दुखापत झाली होती. अशोका हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना 22 मे रोजी सकाळी तिचा मृत्यू झाला. पोलीसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तसेच 81 वर्षीय विठोबा भगाजी कांबळे (रा. सिडको) यांना पोटदुखी व बेशुद्धावस्थेत सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी तपासून रात्री त्यांना मृत घोषित केले.

या सर्व घटनांनी अंबड परिसरात एकाच दिवशी खळबळ उडवून दिली आहे. पोलीस विभाग या सर्व प्रकरणांचा सखोल तपास करत असून नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अद्याप अनेक आरोपी फरार आहेत. त्यामुळे पोलिसांपुढे तपासाची मोठी जबाबदारी निर्माण झाली आहे.

---

# सामाजिक न्याय विभागात नाशिक विभाग राज्यात अव्वलस्थानी



**नाशिक ।** महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम अंतर्गत दुस-या टप्प्याचा निकाल आज रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला आहे. त्यामध्ये राज्याच्या सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मूल्यांकनात नाशिक विभागातील जिल्हा तसेच प्रादेशिक कार्यालयांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत राज्यात नाशिक विभागाने अवलस्थान पटकावले आहे.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात दुसऱ्या टप्यात राज्याच्या सर्व महसूली विभागांमधील ४० विभागस्तरीय कार्यालयांच्या व सर्व जिल्ह्यांमधील ४२ जिल्हास्तरीय कार्यालय या स्पर्धेत सहभागी झाले होते. सामाजिक न्याय विभागाच्या राज्यातील जिल्हा कार्यालयामध्ये नाशिक विभागातील सहाय्यक आयुक्त ,समाज कल्याण जळगाव या कार्याल राज्यात प्रथम क्रमांक, राज्यातील जिल्हा कार्यालयामध्ये जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती नाशिक राज्यात दुसरा क्रमांक तर विभागीयस्तरावरील विभागीय प्रादेशिक कार्यालयांध्ये प्रादेशिक उपायुक्त ,समाज कल्याण नाशिक विभाग नाशिक या कार्यालयाने राज्यात तिसरा क्रमांक मिळविला आहे. राज्याच्या सामाजिक न्याय विभागात नाशिक विभागातील सर्वाधिक ३ कार्यालयांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मुल्यांकन मिळाल्याने नाशिक विभागाने राज्यात अवलस्थान निर्माण केले आहे. शासनाच्या निर्देशानुसार भारतीय गुणवत्ता प्राधिकरणाने नुकतेच कार्यालयाची यासंदर्भात पाहणी केली होती. सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, आयुक्त मा.ओम प्रकाश बकोरिया, तसेच समाज कल्याण आयुक्तालय पुणे येथील वरिष्ठ अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली, नाशिक विभागातील जिल्हा व प्रादेशिक कार्यालयांनी ही कामगिरी केली आहे. १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम नाशिक समाज कल्याण विभागाने अवलस्थानी मिळविल्याने कार्यालयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

---

# ब्लॉक चेन, ए.आय.च्या समन्वयातून कोट्यवधी रोजगारांची शक्यता : अत्तरदे

**वसंत व्याख्यानमालेत तंत्रज्ञानाच्या भविष्यातील चित्र स्पष्ट**

**नाशिक ।** "ब्लॉक-चेन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या आधुनिक डिजिटल प्रणालींच्या समन्वयातून पुढील वीस वर्षांत कोट्यवधी रोजगार निर्मिती होणार आहे," असा ठाम विश्वास अमेरिकास्थित सीईओ प्रमोद अत्तरदे यांनी व्यक्त केला. गंगाघाटावरील यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेतील पुष्पात (दि.२२) अत्तरदे यांनी हे विचार मांडले.




स्व. डॉ. सुभाष सुराणा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित व्याख्यानात "डिजिटल युगातील भविष्याची चाहूल : ब्लॉक-चेन आणि AI" या विषयावर बोलताना, अत्तरदे यांनी डिजिटल परिवर्तन, रोजगार संधी, व मानवी ज्ञानाच्या पुनर्बांधणीबाबत सखोल विवेचन केले.

बदलत्या काळातील बदलती गरज "पुढील ५० वर्षांत तंत्रज्ञान झपाट्याने बदलणार आहे आणि ते आपले जीवन व्यापून टाकेल," असे सांगताना त्यांनी ब्लॉक-चेन व AI या दोन्ही प्रणालींचे उदाहरण देत स्पष्ट केले की, पारंपरिक बँकिंग प्रक्रियेपेक्षा अधिक वेगाने व्यवहार ब्लॉक-चेनद्वारे शक्य होतात.

डिजिटल व्यवहारांची नवी दिशा त्यांनी प्रयागराज येथे झालेल्या कुंभमेळ्याचा संदर्भ देताना सांगितले की, रेल्वे तिकीट देखील ब्लॉक-चेनच्या माध्यमातून नोंदवण्यात आले होते. "डिजिटल रुपी" ही संकल्पना केवळ चलनापुरती मर्यादित न राहता आर्थिक व्यवहारांच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवेल, असे त्यांनी स्पष्ट केले. AI मुळे रोजगाराची नवी दारे AI चा उपयोग बांधकाम, IT, सहकार अशा विविध क्षेत्रांमध्ये होत असून, रोज नव्या तंत्रज्ञानामुळे नव्या संधी निर्माण होत आहेत. "AI इंजिनियर्स" ही आगामी काळातील सर्वाधिक मागणी असलेली कौशल्यवर्ग ठरणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.



माहिती संकलनातून आरोग्यदृष्ट्या भाकित AI व ब्लॉक-चेनच्या सहाय्याने आरोग्य, लोकसंख्या, शेती आदी क्षेत्रांतील माहितीचे संकलन अधिक प्रभावीपणे करता येईल. इतकेच नव्हे तर, कर्करोगासारख्या आजारांची पूर्वसूचना देखील वैयक्तिक आरोग्यविवरणावर आधारित दिली जाऊ शकते, असे त्यांनी उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.

साक्षरता आणि तंत्रज्ञानाचा समन्वय "फक्त साक्षर असून चालणार नाही, तर बदलत्या तंत्रज्ञानाच्या सोबतीने चालण्याची तयारी आवश्यक आहे," अशी विचारप्रवर्तक टिप्पणी त्यांनी करतानाच उपस्थितांना सजगतेचा इशारा दिला. कार्यक्रमाची सुरुवात स्व. डॉ. सुभाष सुराणा यांच्या जीवनावर आधारित चित्रफीत दाखवून झाली. नंतर मान्यवरांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. प्रमोद अत्तरदे, अजित सुराणा यांचा सन्मान स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. व्याख्यानानंतर रसिक सूर व अनघा धोडपकर यांनी ७० च्या दशकातील हिंदी गीतांचा सुरेल कार्यक्रम सादर केला.

एखाद्या प्रकरणाचा निषेध करावा तितका कमीच ठरतो. पण जाहीर निषेध करावा अशी घटना महाराष्ट्राच्या सुपुत्राच्या बाबतीतच घडली. किती दुर्दैवी गोष्ट आहे. एक मराठी माणूस सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश होतो. सरन्यायाधीश झाल्यावर तो पहिल्यांदा महाराष्ट्रात येतो. पण राज्याचे मुख्य सचिव, डिजीपी, सीपी त्यावेळी उपस्थित नसतात. राज्याचे कारभारीच जर संकुचित वृत्तीचे असतील तर अधिकाऱ्यांना दोष देण्यात अर्थ नाही. समाजातील अनेकांमध्ये जी पूर्वापार मानसिकता तयार झाली आहे, तिला कुठेतरी पायबंद बसला पाहिजे. देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मुंबईतील कार्यक्रमात राज्याच्या मुख्य सचिव, पोलीस आयुक्त आणि पोलीस महासंचलांनी प्रोटोकॉल न पाळल्याने नाराजी व्यक्त केली म्हणून आपल्याला निदान त्या घटनेची माहिती तरी झाली. विशेष म्हणजे संबंधितांना त्याची जाणीव होणे गरजेचे होते. अन्यथा नेहमीप्रमाणे एखाद्या विशिष्ट घटकाला दुर्लक्षित करण्याची परंपरा अजूनही चालूच राहिली असती. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हात जोडून माफी मागितली. पण एक प्रश्न नक्कीच निर्माण होतो तो असा की, सरन्यायाधीशांच्या स्वागताला हे अधिकारी का आले नाहीत? सरन्यायाधीशांचं हे भाषण व्हायरल होताच हे तिन्ही अधिकारी धावत पळत दादर चैत्यभूमीवर भूषण गवई यांच्या स्वागताला कसे काय हजर झाले? पण 'बूंद से गयी तो....' या म्हणीचा प्रत्यय संपूर्ण महाराष्ट्राला किंवा देशाला आला. भाषणादरम्यान, सरन्यायाधीशांनी उल्लेख केलेले आर्टिकल १४२ नेमकं काय? याची मात्र चर्चा सुरू झाली. राज्यघटनेतील कलम १४२ हा सर्वोच्च न्यायालयापुढे आलेल्या कोणत्याही प्रकरणात संपूर्ण न्याय करण्यासाठी दिलेला विशेषाधिकार आहे. न्याय करण्यासंदर्भातील आदेशांची अंमलबजावणी करण्याशी संबंधित आहे. या कलमान्वये सर्वोच्च न्यायालय आपल्या अधिकाराचा वापर करीत, त्यांच्यासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही वादात किवा प्रकरणात 'संपूर्ण न्याय' करण्याकरिता आवश्यक असेल असा हुकूमनामा किंवा आदेश देऊ शकतात. भारतीय संविधानात हे कलम समाविष्ट करण्याचा विचार मांडला गेला, तेव्हा सर्वच सदस्यांनी त्याला पाठिंबा दिला होता. हे कलम देशातील विविध वंचित घटकांचे किंवा पर्यावरणाचे रक्षण करण्यास मदत करते. आपल्या भाषणातून गवई यांनी संबंधितांना त्याची जाणीव करून दिली आणि सर्वांना पळायला भाग पाडले. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कारसमारंभावेळी अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवरुन आता वाद सुरू होणे सामाजिकदृष्ट्या योग्य नाही. संबंधितांना जाणीव झाली एवढे पुरेसे आहे. "राज्यघटनेच्या एका संस्थेचा प्रमुख पहिल्यांदा या राज्यामध्ये येत असेल आणि तोही या राज्याचा. तुम्ही दिलेली वागणूक योग्य आहे का याचा तुम्हीच विचार करावा. दुसरा कोणी असता तर कलम १४२ चा कायदा सांगितला असता. मला प्रोटोकॉल द्यावा याची गरज नाही. मात्र विषय पदाचा आणि सन्मानाचा आहेऱ, या वाक्याने गवईंनी संबंधितांना अक्षरशः मोठा टोला मारला आहे. इतके परखड विचार मांडल्यामुळे निदान येथून पुढे तरी संबंधितांना शंभर वेळा विचार करावा लागेल!

# देशाचे 'भूषण' पण प्रोटोकालपासून 'वंचित'!





थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

महाराष्ट्राचा सुपुत्र जिद्द आणि चिकाटीने देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदी पोहचतो आणि त्याच्याच राज्यात सरकारकडून अपमान होतो, ही अत्यंत वाईट घटना आहे.

महाराष्ट्र सरकारमध्ये बसलेल्या सत्ताधाऱ्यांना आणि उच्चपदावर असलेल्या अधिकाऱ्यांना न्यायसंस्थेचा राग आहे की, त्या पदावर बसलेल्या व्यक्तीबद्दल असूया आहे, याचा शोध घ्यावा लागेल. साधा प्रोटोकॉल ज्यांना पाळता येत नाही, त्यांना कुणी विचारणा करणार की नाही? या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी सरकार आणि संबंधित प्रशासकीय अधिकारी यांचीच आहे.

तसे पाहिल्यास महाराष्ट्र सरकारने संविधानिक पदावरील सरन्यायाधीश भूषण गवई यांचा अपमान केला आहे. हा अपमान महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आहे. राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांनी आंबेडकरी चळवळीतील बहुजन भूषण गवईंचा अपमान केला आहे.

सरन्यायाधीशांचा अपमान करणाऱ्यांवर सरकारने कठोर कारवाई केली पाहिजे, असे अनेकांना वाटते. पण भारताच्या सरन्यायाधीशांबाबत कोणताही लिखित प्रोटोकॉल सार्वजनिकरित्या उपलब्ध नाही. हे एक प्रकारचे गोपनीय दस्तऐवज मानले जाते. सरन्यायाधीशांसाठी जे काही नियम आणि कायदे बनवले गेले आहेत, त्यांचा उद्देश त्यांना सुरक्षित ठेवणे आणि न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य राखणे हा आहे.

न्यायमूर्ती गवई महाराष्ट्राचा अभिमान आहेत. राजशिष्टाचारातील या त्रुटी आणि त्यांचा हा अपमान महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला शोभत नाही. या प्रकरणाची संपूर्ण देशात चर्चा झाल्यानंतर व विविध वाहिन्यांवर त्याबाबतचे वृत्त प्रकाशित झाल्यानंतर पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलीस आयुक्त देवेनं भारती, मुख्य सचिव सुजाता सौनिक सरन्यायाधीशांच्या भेटीसाठी तातडीने दादर येथील चैत्यभूमीवर पोहोचले.

सरन्यायाधीशांसोबत त्यांची चर्चा झाली. ती सकारात्मक असेल तर हे प्रकरण आता लांबविण्याचे कारण देखील नाही. कदाचित या तिघांनीही झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागीतलीही असू शकेल. मात्र गवई यांच्या नाराजीनंतर काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधाऱ्यांवर व अधिकाऱ्यांवर टीकास्त्र सोडलं आहे. सत्ताधाऱ्यांना व अधिकाऱ्यांना न्यायसंस्थेचा राग आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

भूषण गवई महाराष्ट्राचे आहेत. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात त्यांनी काम केलं आहे. सध्या सरन्यायाधीश या सर्वोच्च पदावर त्यांची नियुक्ती झाली आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय त्यांनी न्यायाधीश म्हणून घेतले आहेत. त्यांचा आदर सत्कार करणे महाराष्ट्राची जबाबदारी आहे. महाराष्ट्र सरकारमध्ये बसलेल्या सत्ताधाऱ्यांना आणि उच्चपदावर असलेल्या अधिकाऱ्यांना न्यायसंस्थेचा राग आहे का? साधा प्रोटोकॉल पाळता येत नाही का? याची जबाबदारी सरकार आणि संबंधित प्रशासकीय अधिकारी घेणार का? ही कोणाची चूक आहे?

महाराष्ट्राचा सुपुत्र जिद्द आणि चिकाटीने देशातील सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी पोहचतो आणि त्याच्याच राज्यात सरकारकडून अपमान होतो ही अत्यंत वाईट घटना आहे. शेवटी असे म्हणावे लागेल की, सरकारी प्रोटोकॉलनुसार स्वागत न करणे, हे भारताला सतत भेडसावणाऱ्या जातीय भेदभावाचे स्पष्ट उदाहरण दिसते. प्रोटोकॉल ही काही नवीन संकल्पना नाही; ती एका संवैधानिक संस्थेला दुसऱ्या संस्थेने दिलेल्या आदराचे प्रतिनिधित्व असते. ही घटना सरकारच्या भूमिकेचे एक उदाहरण आहे असे समजू या!

■ ■ ■

## महाराष्ट्र बार कौन्सिलने घेतली कठोर भूमिका

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी बार कौन्सिलच्या कार्यक्रमात खंत व्यक्त केली काय आणि संपूर्ण देशात त्यावरून वादळ उठले. जे घडायला नको होते ते प्रशासकीय अधिकाऱ्याकडून घडून गेले हे मात्र सत्य आहे. विरोधी गटाकडून त्याचे वेगवेगळे अर्थ काढून प्रसार माध्यमांना पोहोचविले आहे. गवळींच्या कथित अवमानाविषयी महाराष्ट्र बार कौन्सिलने कठोर भूमिका घेतली आहे. कौन्सिलने या प्रकरणी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून सरन्यायाधीशांचा अवमान करणाऱ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली? अशी विचारणा केली आहे. विशेषतः या प्रकरणी कारवाई झाली नाही तर कौन्सिल स्वतः यासंबंधी योग्य ते पाऊल उचलेल असा त्यांना इशाराही दिला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिले अध्यक्ष ॲड. विठ्ठल कोंडे देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून त्यांना संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली? याची माहिती महिन्याभरात कळवण्याची सूचना केली आहे. दुसरीकडे, सरन्यायाधीशांनी झाल्या प्रकाराची गंभीर दखल घेतल्यानंतर राज्य सरकारने तातडीने त्यांना राज्य अतिथी हा दर्जा बहाल केला आहे. पण आता या प्रकरणात थेट बार कौन्सिलने उडी घेतल्यामुळे राज्याच्या तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## प्रकाश आंबेडकरांचा गवईंना सल्ला

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई हे मुंबई येथे आल्यावर राज्याचे मुख्य सचिव किंवा इतर कोणी त्यांच्या स्वागतासाठी आले नाहीत. मुख्य न्यायाधीशांच्या खुर्चीवर बसल्यानंतर ते मुंबईत प्रथमच आले होते. हा विषय सर्वत्र चर्चेला गेल्यानंतर प्रकाश आंबेडकर शांत थोडेच बसणार. त्यांनी त्यामुळेच आपली प्रतिक्रिया जरा वेगळीच दिली. 'स्वतःची इभ्रत स्वतः राखली पाहिजे. त्या खुर्चीची गरिमा ठेवणार आहेत की नाहीत? न्यायाधीश गवई हे स्वतःच्या हिमतीने न्यायाधीश खुर्चीपर्यंत पोहोचले आहेत, महाराष्ट्र शासन काय करेल ते नंतर करेल. मात्र, त्यांनी नोटीस काढून पदाची प्रतिष्ठा राखावी' असा सल्ला प्रकाश आंबेडकर यांनी दिला. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मुंबईतील सत्कार सोहळ्यात एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्याने गवई यांनी याबद्दल खंत व्यक्त करत अधिकाऱ्यांची कान उघडणी केली होती. परंतु हे प्रकरण किती ताणावे यालाही मर्यादा आहे. त्यामुळेच कान उघडणी केल्यानंतर गवई यांनी हे प्रकरण शांत करून टाकले. संबंधितांना जो संदेश द्यायचा होता, तो भर कार्यक्रमातून दिला. त्यामुळे अजून काय करायचे? इथून पुढे असा प्रकार घडणार नाही असा खुलासा संबंधितांनी तर केलाच, पण शासनाने देखील तातडीने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

# ती हुंडाबळी ठरू नये म्हणून...



प्रमोद गायकवाड
नाशिक.

सध्या वैष्णवी हगवणे या भगिनीची हुंडाबळी केस सर्वत्र गाजते आहे. पैशासाठी किती निर्दयीपणे मुलींना मारून टाकण्यात येते आणि इतक्या नीच मानसिकतेचे लोक समाजात उजळ माथ्याने वावरतात हे बघून मान खाली जाते.

ज्या देशात राजा राम मोहन रॉय, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, डॉ. आंबेडकर, शाहू महाराज, गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर कर्वे असे थोर समाजसेवक होऊन गेले त्या देशात अशा घटना घडणे यासारखी लांच्छनास्पद गोष्ट नाही.

किती हुंडा घेतला यावरून लोकांची प्रतिष्ठा ठरते आणि हुंड्याची रक्कम लोक अभिमानाने सांगतात. काही ठिकाणी हुंडा नको नको म्हणत गाडया, महागड्या वस्तू अथवा भरमसाट सोने घेण्याचीही आडवळणाने प्रथा आहे.

आता ज्यांच्याकडे कमावलेला अथवा भ्रष्टाचाराचा पैसा आहे ते देतात कौतुकाने. पण ज्या लोकांची तेवढी आर्थिक परिस्थिती नाही त्या बिचा?यांना या दुष्टचक्रात फासण्यावाचून गत्यंतर नाही. खरे म्हणजे आपल्याकडे सामाजिक सुधारणांची सुरुवात होऊन दिड दोनशे वर्षे होऊन गेलेत. पण तरीही २१व्या शतकातल्या आधुनिक काळातही हुंड्यासारख्या नीच प्रथा सुरु आहेत हीच अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे.

सध्या इव्हेंट लग्नाच्या नावाचाही हिडीस प्रकार सुरु आहे आणि त्यात कोटयावधी रुपये खर्च होतात. हा इव्हेंट लग्नांचा सर्वात मोठा बाजार जर कुणी मांडला असेल तर तो इझी मनी कमावणारे राजकीय नेते आणि सरकारी अधिकारी यांनी. उद्योगपती आणि अन्य क्षेत्रातील स्वतःला प्रतिष्ठित समजणारी मंडळीही यात सामील आहेच.

तुम्ही एखाद्या आमदार, खासदार, मंत्री, जीप सदस्य अशा राजकीय नेत्याच्या किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या घरच्या लग्नाला गेले तर कळते एकेका लग्नात ३-४ कोटी रुपये सहज खर्च होतात. (सन्माननीय अपवाद आहेतच).

साखरपुडा, प्रिवेडिंग फोटो शूट, हळद, संगीत, वैदिक लग्न, अक्षदा लग्न, रिसेप्शन या प्रकारांवर लाखो रुपये खर्च केले जातात. हा वारेमाप उधळला जाणारा पैसा कुठल्या भ्रष्ट मार्गाने येतो हे ओपन सिक्रेट आहे पण तोंडावर कुणी बोलत नाही इतकेच.

खरे म्हणजे राजकीय नेते आणि सरकारी अधिकारी हे लोक समाजाच्या अग्रभागी असल्याने त्यांची कृती ही इतरांसाठी अनुकरणीय असते. पण चांगल्या कृतीतून समाजाला दिशा देणारे लोक अपवादानेच आढळतात. आपल्याकडे असलेल्या भ्रष्ट पैशांची उधळपट्टी करणारेच जास्त असतात. त्यामुळे ऐपत असो नसो खोट्या प्रतिष्ठेसाठी मग बहुतांश लोक त्यांचे अनुकरण करतात.

अनेक मुलाकडची मंडळी तर अजूनही हा सर्व खर्च मुलीच्या बापाने करावा अशा मानसिकतेत असतात. अर्थातच अनेक मुलींचे पालक हे मान्य करतात हेही चुकीचे आहे. आपल्या शिकल्या सवरल्या मुली अशा हावरटांच्या घरात पाठवताना त्यांनीही शंभर वेळा विचार करायला हवा. त्यातूनच फुकटची सवय झाल्याने काही मुलाकडचे लोक लग्नानंतरही अवास्तव मागण्या करत राहतात.

■ ■ (उर्वरीत भाग उद्याच्या अंकात) ■ ■

# ४०,१७७ सजीवांचे अस्तित्व धोक्यात!

पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी व फुलपाखरे बागडावीत. पण सद्याच्या स्थितीत पाहिले तर सगळीकडे कॉन्क्रीटीकरण वाढलेले आहे. त्यामुळे आजूबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाडे लावली जातात. अस जर होत राहीले तर त्या फुलपाखरांनी बागडायचे कुठे? त्यांनी मध कुठे तयार करायचा?

-------------------

जैवविविधता ही पृथ्वीवरील जीवसृष्टीची जैविक विविधता आणि परिवर्तनशीलता आहे. जैवविविधता हे जनुकीय, प्रजाती आणि परिसंस्थेच्या पातळीवरील भिन्नतेचे मोजमाप आहे. तलाव, तळे, नदी आदी परिसंस्थेचा अभ्यास करून तेथे पाहण्यात आलेल्या जैवघटकांची माहिती घेतली जाते. त्यात सजीवांमधील विविध जाती, परिसंस्था, बायोम किंवा पूर्ण पृथ्वीवर विविधता आढळून येते.

परिसंस्थेमधील विविधता हे परिसंस्थेच्या निकोपपणाचे एकक आहे. ती बऱ्याच प्रमाणात भूभागाच्या हवामानावर अवलंबून असते. उदाहरणार्थ, उष्णप्रदेशीय भागामध्ये जैवविविधता अधिक तर ध्रुवीय भागामध्ये विविधता कमी असते. जैवविविधता पृथ्वीवर समप्रमाणात पसरलेली नाही. त्यांत विस्ताराची विविधता आढळतेच. एवढेच नव्हे तर एकाच प्रदेशामध्ये सारखेपणा आढळून येत नाही.

सजीवांमधील विविधता ही तापमान, पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, समुद्र सपाटीपासूनची उंची, भूप्रदेशाचे गुणधर्म आणि सभोवती असलेले इतर सजीवांचे अस्तित्व यांवर अवलंबून असते. सजीवांच्या देशी जाती व अप्रिसंस्थेच्या वितरणाच्या अभ्यासास जैवभूगोल असे म्हणतात. विषुववृताजवळील उष्णप्रदेशामध्ये विविधता अधिक तर ध्रुवीय प्रदेशामध्ये कमी विविधता आढळते, हे वर आलेच आहे.

सन २००६ मध्ये आययूसीएन या संस्थेने दुर्मीळ किंवा अस्तित्व धोक्यात आल्याचे जाहीर केलेल्या सजीवांची संख्या ४०,१७७ एवढी होती. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार अशा जातींची संख्या दहा लाखांवर पोहोचेल. भूप्रदेशावरील विविधता महासागरी विविधतेपेक्षा पंचवीस पटीनी अधिक आहे.

झपाट्याने होणाऱ्या परिसरातील बदलांमुळे सजीव सामूहिकरीत्या लुप्त होतात. एका अंदाजानुसार पृथ्वीवर असलेल्या एकूण सजीवांपैकी एक टक्का सजीव लुप्त झाले आहेत. सजीवांची पृथ्वीवर निर्मिती झाल्यापासून आजपर्यंत पाच वेळा मोठ्या प्रमाणात आणि अनेक वेळा लहान प्रमाणात जैवविविधतेचा नाश झाला आहे.

सुमारे चौप्पन कोटी वर्षांपूर्वी फेनेरोझोइक महाकल्पामध्ये जैवविविधतेचा महाविकास कॅम्ब्रियन कल्पामधील विविधतेचा स्फोट या नावाने ओळखला जातो. बहुपेशीय सजीवांमधील सर्व संघांची निर्मिती झालेली होती. त्यांपुढील चाळीस कोटी वर्षांमध्ये जैवविविधतेचा पुन्हा पुन्हा नाश झालेला होता.

कार्बोनिफेरस युगामध्ये सदाहरित वनांमधील वनस्पती आणि प्राण्यांचा नाश झाला. पर्मियन ट्रायासिक युगामध्ये पंचवीस कोटी वर्षांपूर्वी झालेला जैवविविधतेचा नाश सर्वात मोठा होता. तीन कोटी वर्षापूर्वी पृष्ठवंशी सजीवांनी पुन्हा एकदा आपला जम बसवला.

साडेसहा कोटी वर्षांपूर्वी झालेला क्रिटेशियस- टर्शरी विनाश हा नजीकच्या काळातील जैवविविधतेचा नाश होय. याच काळात डायनॉसोर नष्ट झाले. जैवविविधतेत माणसाचा प्रवेश झाल्यानंतर ती आणि जनुकीय विविधता हळू हळू नाहीशी होत आहे. यास हॉलोसिन विनाश असे म्हटले जाते.

मानवी हस्तक्षेपामुळे अधिवास नष्ट झाल्याने जैवविविधतेचा आतोनात नाश होत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जैवविविधतेच्या नाशाकडे लक्ष देण्यासाठी इसवी सनाचे २०११-२०२० हे दशक जैवविविधता दशक म्हणून जाहीर केले होते. पूर्वी घराच्या आजूबाजूला वेगवेगळी फळांची व फुलांची झाड लावली जायची जेणेकरून त्यावर पक्षी व फुलपाखरे बागडावीत. पण सद्याच्या स्थितीत पाहिले तर सगळीकडे कॉन्क्रीटीकरण वाढलेले आहे. त्यामुळे आजूबाजूला जास्त परिसरच नाही व जेवढा आहे तेवढ्यात वेगवेगळी शोची झाडे लावली जातात. अस जर होत राहीले तर त्या फुलपाखरांनी बागडायचे कुठे? त्यांनी मध कुठे तयार करायचा?

कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी
गडचिरोली.
९४२३७१४८८६.

आज अस्तित्वात असलेल्या जैवविविधतेमागे ३५० कोटी वर्षांचा इतिहास आहे. सजीवांची नक्की निर्मिती केव्हा झाली? हे जरी वैज्ञानिकाना सांगता आले नाही तरी पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर वीस ते तीस कोटी वषानंतर प्राथमिक रचना असलेले सजीव अस्तित्वात आले, यावर वैज्ञानिक ठाम आहेत.

जैवविविधतेमुळे अनेक पर्यावरण सेवा उपलब्ध झाल्या आहेत. या सेवा प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्षपणे मानवी जीवन सुसह्य बनवतात. हवेच्या घटकांचे संतुलन, गोड्या पाण्याचे चक्र, यांचे मूल्यमापन अशक्य आहे.

यामधील जैवविविधतेच्या मदतीचे रुपयात किंवा डॉलरमध्ये मूल्य केल्यास कोणत्याही प्रगत राष्ट्राला ते चुकवता येणार नाही. मृदेमधील अन्नघटक चक्र, सुपीक जमीन तयार करणे, अशी कामे मानवी प्रयत्नांनी करायची ठरवली तर ते अशक्य आहे. केवळ संतुलितपणे ज्या सेवा जैवविविधतेमुळे मिळतात त्या अमूल्य आहेत. एकच उदाहरण द्यायचे तर ते कीटकाद्वारे होणाऱ्या परागीभवनाचे द्यावे लागेल. कीटकांनी मानवास दिलेली ही देणगी पैसे खर्च करून करवून घ्यायची तर किती रक्कम द्यावी लागेल? याचा विचारच न केलेला बरा.

जैवविविधता विलोपनामध्ये अधिवास बदल किंवा अधिवास नाहीसा होण्याचा मोठा धोका उद्भवतो. सदाहरित जंगलामध्ये होत असलेली वृक्षतोड, लोकसंख्या वाढ, जंगलाच्या जमिनीत खाणकाम, हवा प्रदूषण, मृदा प्रदूषण आणि जल प्रदूषण याशिवाय जागतिक हवामान वाढ या सवार्चा अधिवास बदलाशी संबंध येतो.

अधिवासाचे क्षेत्रफळ आणि त्या अधिवासामध्ये असणाऱ्या जातींची संख्या परस्परांवर अवलंबून आहेत. त्यांतल्या त्यात आकाराने मोठ्या जाती व समुद्र सपाटीलगत असणाऱ्या जंगलातील जाती-अधिवास बदलास संवेदनक्षम आहेत. दक्षिण भारतातील सलग जंगलांचे पट्टे नष्ट झाल्याने पश्चिम घाट जंगलातील हत्ती उन्हाळ्यात पीक क्षेत्रामध्ये घुसतात. ऊस हे त्याना त्यांचे नैसर्गिक खाद्य वाटल्याने ते तेथेच राहतात. त्याना हुसकून लावण्याचा प्रयत्न केल्यास ते परत परत तेथेच येत राहतात.

मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाल्यानंतर पुनर्वनीकरणात अस्तित्वात असलेल्या सर्व वनस्पती परत कधीच लावता येत नाहीत. एकाच प्रकारच्या वृक्षांचे पट्टे लावण्याने त्या परिसरामध्ये असलेली विविधता नष्ट होते. नॅशनल सायन्स फाउंडेशन यानी केलेल्या २००७च्या अभ्यासातून असे समजले की जैवविविधता आणि जनुकीय विविधता यांचा परस्पर संबंध आहे.

जातींमधील विविधतेसाठी जातींत जनुकीय विविधता असणे आवश्यक आहे. एका घटकाचा अभाव म्हणजे दोन्हीमधील संतुलन संपणे होय. अशा वेळी परिसरात एकच जाती प्रबळ ठरते. पाळीव प्राण्यांच्या बाबतील हे सहज समजून येते. पशुपालनासाठी राखीव कुरणे म्हणजे फक्त दूध किंवा मांसासाठी जनावरे पाळणे, हाच प्रकार कृषिव्यवस्थेमध्ये घडतो. उत्पादन घटण्याच्या भीतीने दुसरी वनस्पती म्हणजे तण शेतामध्ये वाढू दिले जात नाही, अगदी तसे होय.

पृथ्वीवर एका वेळी सर्वाधिक किती सजीव राहू शकतील, ही पृथ्वी ग्रहाची सजीव धारण क्षमता झाली. उदा.एका हेक्टरमध्ये अधिकतम किती गव्हाचे उत्पादन घेता येईल याची जीवशास्त्रीय मयार्दा गणिताने काढता येते. जाति-विविधता किती असू शकेल, याचा अंदाजही काढता येतो. सागरी सजीवाची विविधता वृद्धिवक्र पद्धतीने तर भूमीवरील सजीवांची विविधता घातश्रेणीने वाढते.

एका वैज्ञानिकाच्या मते चतुष्पाद प्राणी आजच्या घटकेला भूप्रदेशावरील ६४ टक्के प्रदेशातसुद्धा पोहोचलेले नाहीत. मानवी हस्तक्षेपाशिवाय चतुष्पाद सजीवांची वाढ अशा पद्धतीने होण्याची शक्यता आहे, की सर्व प्रकारच्या परिसंस्थेमध्ये चतुष्पाद पोहोचतील. जेवढी पूर्वजांची संख्या अधिक तेवढी त्यापासून निर्माण होणाऱ्या पिढ्यांची संख्या अधिक असते.

वृद्धीसाठी आवश्यक घटकांचा तुटवडा असल्यास सजीवांची विविधता कमी होते. मानवी हस्तक्षेपामुळे सद्या फक्त १०० वर्षामध्ये इतर सजीवांचा नाश होण्याची शक्यता आहे. मग सांगा भाऊ, मानवाचे अस्तित्व कायम तग धरून राहू शकेल का? म्हणून माणसा, तू जैवविविधता संरक्षित व संवर्धित कर, अन्यथा तुझा सत्यानाश झालाच म्हणून समज..!

■ ■ ■

## बेरोजगारीचा भस्मासूर!

वाचक लिहितात

राज्यात आणि देशात बेरोजगारीची समस्या दिवसागणिक बिकट होत असली तरी शासनकर्त्यांना त्याचे काही घेणेदेणे वाटत नाही. त्यांचे मोर्चे, आंदोलन, सभा यासाठी अशा निकामी तरूणांची फौज नेत्यांना हवीच असते. काही दिवसांपूर्वी रेल्वे विभागाच्यावतिने ग्रुप डी च्या पदासाठी जाहिरात निघाली होती. माहितीनुसार, ३२ हजार ४३८ रिक्त पदासाठी देशभरातून १ कोटी ८ लाख २२ हजार ४२३ इतके अर्ज आलेत. वीस, पंचेवीस हजाराच्या पगारासाठीही किती मारामार आहे, हे यावरून लक्षात यावे. उच्चशिक्षीत तरूण, तरूणींच्या हाताला काम नाही, त्यातून नैराश्याने ग्रासलेले एकतर आत्महत्या करतात, किंवा गुन्हेगारीकडे वळतात. देशात नेते मात्र लोकांच्या पैशावर फुकटात मजा मारत आहेत.

■ निखील मेश्राम, नागपूर.



## किडनी स्टोन... दही खावे की नाही?

किडनी स्टोन असणे ही एक गंभीर समस्या आहे. आपल्या देशातील सुमारे १२ टक्के लोकांना किडनी स्टोनचा त्रास आहे. काही जण ते ऑपरेशन करून काढतात तर काहीजण औषधांच्या मदतीने लघवीवाटे म्हणजे नैसर्गिक पद्धतीचा वापर करतात.

पण एकदा हा स्टोन शरीराच्या बाहेर निघाला तरी ते वारंवार होतच असतात. मग भलेही ते काही काळानंतर का असेना पण ते पुन्हा तयार होतात. याची कारणं असतात लठ्ठपणा, वजन वाढणे, वजन कमी करण्याची शस्त्रक्रिया किंवा आहारात जास्त साखर आणि मीठ सेवन करणे असू शकते.

किडनी स्टोनच्या रुग्णांनी त्यांच्या आहाराची विशेष काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जातो. काही भाज्या ज्या स्टोन तयार करण्यासाठी कारण ठरतात अशा भाज्या तर नक्कीच न खाण्याचा सल्ला दिला जातो. पण अनेकांमध्ये एका पदार्थाबाबत नेहीमच संभ्रम राहिला आहे. तो पदार्थ म्हणजे दही. होय अनेकदा हा पश्न विचारला जातो की किडनी स्टोन असेल तर दही खावे की नाही? आणि अनेक लोकांना याबाबत फारशी माहिती नाही. खरंतर दह्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने, प्रोबायोटिक्स आणि व्हिटॅमिन डी सारखे पोषक घटक असतात. त्यामुळे पचन सुधारते, परंतु किडनी स्टोनच्या रुग्णांनी दह्याचे सेवन करावे का?

आहारतज्ज्ञ आणि पोषणतज्ञांच्या मते किडनी स्टोनच्या रुग्णांनी दूध आणि दुग्धजन्य पदार्थांना तुमच्या संतुलित आहाराचा भाग बनवण्यापूर्वी काळजी घेतली पाहिजे. किडनी स्टोन असलेले रुग्ण देखील दही खाऊ शकतात पण त्यांनी मर्यादित प्रमाणात त्याचं सेवन करावं.

दह्यामध्ये भरपूर कॅल्शियम असतात. जास्त प्रमाणात कॅल्शियम सेवन केल्याने स्टोनचा धोका वाढतो. ऑक्सलेट आणि कॅल्शियम जास्त प्रमाणात सेवन केल्याने स्टोन तयार होण्याची शक्यता जास्तच वाढते.

किडनी स्टोनच्या रुग्णांनी दही खाताना खूप काळजी घ्यावी. ते खूप मर्यादित प्रमाणात खावे. जर किडनी स्टोनचा रुग्ण नियमितपणे दुधापासून बनवलेले इतर पदार्थ जरी खात असेल तर ते टाळणेच चांगले. त्यांच्या आहारातून दूध आणि दुग्धजन्य पदार्थ पूर्णपणे कमी करू नये. पण कॅल्शियमयुक्त पदार्थ कमी घेण्यावर लक्ष द्यावं.

किडनी स्टोन व्यतिरिक्त, जर किडनीशी संबंधित इतर कोणतीही समस्या असेल तर त्या रुग्णांनी दही खाऊ नये. जर किडनी स्टोन असलेल्या व्यक्तीला हायपरॉक्सॅलुरिया असेल तर त्या व्यक्तीने दही खाऊ नये. हायपरॉक्सॅलुरिया ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये लघवीमध्ये ऑक्सलेटचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे दही शक्यतो खाणे टाळा.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### खेळ मांडीयेला!

देव एकच रुपे अनेक
हे तुम्ही आम्ही जाणता
ट्रस्टींनो वार्षिक उत्सवाच्या वेळी
मुळ देवाला ईतर देवाच्या रुपात
सजवून का बरे
भक्तांच्या भावनेला
कॅशअप करता?

प्रत्येक देवांचे वैशिष्टे वेगळे
ऑल ईन वनची नाटके
का करता सगळे?
उद्दीष्ट एकच, एनकेन प्रकारे
देणग्यांचा प्रवाह
रहावा अखंडीत..!

तसे नसेल तर
एकाच देवाची प्रतिमा
सर्वत्र कराना तुम्ही स्थापित..!

# तारांगण अवतरणार भूतलावर


## भंडारदरा, मुरशेत घाटघर परिसरात १५ मे ते २० जूनपर्यंत काजवा महोत्सव

(राम शिंदे यांजकडून)

**सर्वतीर्थ टाकेद ।** नाशिक - नगर या दोन जिल्ह्याच्या सरहद्दीवरील कळसुबाई, भंडारदरा, घाटघर परिसरात काजवा महोत्सवाला दमदार सुरुवात झाली असून रोज शेकडोंच्या संख्येने पर्यटक काजवा महोत्सव बघण्यासाठी गर्दी करतांना दिसत आहे. ग्रीष्म ऋतू संपतो न संपतो तोच वर्षा ऋतूच्या स्वागतासाठी निसर्ग देवता जणू काजव्यांच्या रुपात धर्तीवर अवतरलीय की काय असा विचार मनात चमकून जावा, तसेच काहीसे गगनातील तारांगण जणू भूतलावर उतरलेय. रात्रच चांदण्यांची झालीये असा भास येथील महोत्सवाच्या निमित्ताने काजव्यांचा दुनियेत येते. पाऊस झाला आणि लक्ष लक्ष दिवे जणू आकाशात उजळल्याचा भास झाला.







**काजव्यांची अदभूत अनोखी दुनिया**

भंडारदरा-घाटघर मुरशेत कळसुबाई परिसरात पावसाळ्यातील जलोत्सव, ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये फुलोत्सव आणि मे अखेर व जून महिन्याच्या सुरुवातीला पहिल्या पंधरवाड्यात हजारो झाडांवर काजव्यांची ही अनोखी अनोखी दुनिया अवतरते. महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसुबाई शिखराच्या पायथ्याशी असलेल्या घाटघर, उडदावणे, पांजरे, मुरशेत, मुतखेल, कोलटेम्भे, भंडारदरा, चिंचोंडी, बारी या खेड्यांच्या शिवारात आणि रंधा धबधब्याजवळील परिसरातील झाडे दरवर्षी लक्षावधी काजव्यांनी उजळून निघतात. लघडतात, हिरडा, बेहडा, सादडा, जांभूळ, आंबा, उंबर अश्या निवडक झाडांवरच काजव्यांचा हा काही दिवसांचा अद्भुत खेळ चालतो.

यावर्षी काजवा महोत्सव 15 मे पासून वनविभागामार्फत जाहीर करण्यात आला असून मात्र काजवे दिसण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने पर्यटकांचा भ्रमनिरास होतांना दिसत आहे. पाऊस पडल्यामुळे आता मात्र काजव्यांची चमचम पुढील दिवसांत मोठ्या मोठया प्रमाणात दिसून येणार असल्याने भंडारदरा परिसरात खऱ्या अर्थाने काजव्यांची चाहूल लागल्याचे दिसते. पर्यटकांची काजवा महोत्सवाला होणारी संभाव्य गर्दी लक्ष्यात घेता वन विभागाकडून पर्यटकांना काजव्यांच्या जादूच्या दुनियेचा आनंद घेता यावा, म्हणून जय्यत तयारी करण्यात आली आहे. काजवा महोत्सवात होणारी पर्यटकांची गर्दी पाहता भंडारदरा परिसरातील हॉटेल व्यवसायिक सज्ज झाले आहेत. नियमांचे पालन करून काजवा महोत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन नाशिक विभागाचे सहाय्यक वन संरक्षण अधिकारी गणेश रणदिवे यांनी केली आहे.

### नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना

नाशिक वन्यजीव विभागाने घालुन दिलेले नियम अभयारण्य क्षेत्रात काटेकोरपणे पाळावेत,काजव्यांचा प्रजनन काळ धोक्यात येणार नाही.पर्यटकांनी त्यांचे वाहने वाहन तळातच उभी करावी. काजवे ज्या झाडांवर लुकलूकत असतील त्या झाडांपासून पन्नास फूट अंतर राखावे. यावेळी मोबाईल टॉर्च ,एल इ डी किंवा अन्य बॅटरीचा श्रोत झाडांवर टाकू नये. कुठलीही गाणी अथवा वाहनांचे हॉर्न वाजवून गोंगाट, गोंधळ करू नये. असे आवाहन पर्यटक संचलनालायकडून करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करतांना आढळून आल्यास वन व पोलीस विभागाच्या कारवाईला सामोरे जावे लागेल त्यांस पर्यटक स्वतः जबाबदार असतील. असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**काजवा महोत्सवातून आदिवासींना रोजगार**

ग्रामीण अर्थकारणाला काजव्यांचा बुस्टर डोस मिळत असतो. दरवर्षी काजवा महोत्सवाच्या निमित्ताने भंडारदरा परिसरात जवळपास पन्नास ते साठ लाखांची उलाढाल होत असते. काजव्यांचे तारांगण बघण्यासाठी येणारे पर्यटक येथे जांभूळ, आवळा, करवंदे, आंबा, जांभुट्या, आंबळे, शेंगा आदी रांनमेव्याचा आस्वाद घेत काजव्यांचा आनंद द्विगुणित करत असतात. यातून स्थानिक आदिवासी बांधवांना रोजगार पण उपलब्ध होत असतो. मात्र यावर्षी रानमेवा हा अल्प प्रमाणात असल्याने सध्या रानमेवा दुर्मिळ झाला असून डोंगराची काळी मैना बाजारात दिसत नसल्याचे चित्र यंदा आहे. परिसरातील दहा ते पंधरा हॉटेल, रेस्टॉरंट, घरगुती खाणावळी, टेंट कॅम्पिंग यांचा साधारण चाळीस लाखांच्या आसपास व्यवसाय होत असतो.

**काजवा प्रेमींसाठी सांस्कृतिक महोत्सव**

महाराष्ट्र पर्यटन संचलनालयाकडून काजवा प्रेमींसाठी दरवर्षी सांस्कृतिक मेजवानी आयोजित केली जाते. भंडारदरा पर्यटन संचलनालयाकडून दोन दिवसीय उपक्रम राबविण्यात येत असतो. भंडारदरा वनपरिक्षेत्रातील पांजरे, गावठा, मुरशेत परिसरात बोहडा, आदिवासी नृत्य या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी २५ ते २७ मे दरम्यान लव्हाळवाडी येथे बोहडाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील शेंडी वन तपासणी नाक्यावरून पर्यटकांना वन्यजीव विभागाचे प्रवेश शुल्क भरून प्रवेश करत अभयारण्यातील पांजरे गावठा पर्यंत पोहचावे लागणार आहे. येथील महसुली क्षेत्रात स्थानिक आदिवासी लोकांनी उत्पादित व स्वतः निर्मित केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन देखील करण्यात येणार आहे. काळा तांदूळ, हात सडीचा तांदूळ, नागली, वरई, विविध भरड धान्य आणि बांबू हस्तकलेपासून तयार केलेल्या विविध शोभेच्या वस्तूही पर्यटकांना खरेदी करता येणार असल्याचे संचलनालयाने दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. अनेक आयोजकांनी काजवा महोत्सव आकर्षित करण्यासाठी शोशल मीडियाचा आधार घेतला आहे. सोशल मीडियावर इन्स्टाग्राम, व्हाट्सअँप, फेसबुक वर काजवा महोत्सवाची जय्यत तयारी रिल्स द्वारे बघायला मिळत आहे. काजवा महोत्सवासाठी होणारी गर्दी लक्ष्यात घेता वन विभागाकडून अगोदरच तयारी सुरू होती. येणाऱ्या पर्यटकांना काजवा महोत्सवाचा चांगला आनंद घेता यावा यासाठी स्थानिक अभयारण्यातील प्रत्येक गावातील सदस्यांची आढावा बैठक आयोजित करून चांगली व्यवस्था देण्यात आली. हॉटेल व्यवसायिक सुशिक्षित बेरोजगार तरुण, गाईड व महाराष्ट्र पर्यटक निवास यांनीही पर्यटकांना काजवा महोत्सवात आकर्षित करण्यासाठी विशेष सूचना दिल्या आहेत. अनेक टेंटधारक आकर्षक दरात काजवा बुकिंग करत आहेत. मागील तीन चार वर्षांपूर्वी कोरोना या विषाणूजन्य रोगामुळे काजवा महोत्सवावर विपरीत परिणाम होऊन आदिवासी युवकांचा रोजगार थांबला गेला होता. मात्र गत दोन वर्षापासून पुन्हा काजवा महोत्सव नव्या जोमाने सुरू झालेला आहे.

महाराष्ट्र पर्यटन संचलनालयाकडून भंडारदरा, कळसूबाई, हरिश्चंद्रगड, अभयारण्याच्या परिसरात यंदाही काजवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. सध्या हा काजवा महोत्सव चालू झाला आहे. दरवर्षी येथे काजव्यांचा प्रकाशोत्सव आयोजित केला जातो. निसर्गाचा नयनरम्य सोहळा डोळ्यात साठविण्यासाठी निसर्गप्रेमी हजेरी लावत आहे. ३ व ४ जून रोजी भंडारदरा वनपरिक्षेत्रातील पांजरे गावात आदिवासी लोककला नृत्याची सांस्कृतिक मेजवानी आयोजित केली होती. या महोत्सवासाठी एक महिना अगोदरच बुकिंग झाल्या होत्या. अकोले तालुक्यातील पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वत रांगेत असणाऱ्या कळसुबाई हरीचंद्र गड अभयारण्यात पावसाळ्याच्या अगोदर काजव्याची चमचम सुरू होत असते.

### पर्यटकांनी नियमांचे पालन करावे

काजवा महोत्सवासाठी पर्यटकांची तोबा गर्दी पाहायला मिळणार असल्याने रात्री साडेनऊ नंतर अभयारण्य क्षेत्रात पर्यटकांना प्रवेश दिला जाणार नसून दहानंतर पर्यटकांना अभयारण्य परिसरात फिरता येणार नाही. तर ठिकठिकाणी पर्यटक व त्यांच्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. पर्यटकांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

**– गणेश रणदिवे (सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी, वन्य जीव वनविभाग नाशिक)**

ही काजव्यांची चमचम म्हणजे पावसाची चाहूल असते. हिरडा, बेहडा, सादडा यांसारख्या झाडांवर स्वयंप्रकाशित काजवा कीटक कोट्यवधींच्या संख्येने एकाच वेळेस लयबद्ध चमकत असतात. हा काजव्यांचा चमत्कार बघण्यासाठी दरवर्षी २५ मे ते २० जूनपर्यंत हजारो पर्यटक भंडारदरा येथे दाखल होत असतात.

या वर्षी काजव्यांची चमचम वेळेवर सुरू झाली असून अनेक पर्यटकांनी काजव्यांचा हा अद्भुत करिष्मा व्यवस्थित बघता यावा यासाठी अनेक पर्यटकांनी टेंटधारक,हॉटेलमध्ये अँडवान्स बुकिंग करून ठेवल्या होत्या. काही ऑर्गनायजर्सनी काजवा महोत्सवामध्ये वेगवेगळे इव्हेंट आयोजित केले होते. अनेक आयोजकांनी पर्यटकांना काजवा महोत्सवात आकर्षित करण्यासाठी सोशल मीडियाचा आधार घेतला आहे.

## महत्त्वाचे

### व्हिजन हॉस्पिटलतर्फे ४६६ नागरिकांची आरोग्य तपासणी

**नाशिक ।** श्री रामेश्वर नाईक मुख्यमंत्री सचिवलय कक्ष यांच्या अंतर्गत आणि कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांच्या संयोगाने धर्मदाय रुणालय मदत कक्ष आरोग्य सेवा सप्ताहा निमित्त दि. १७ ते २३ मे पर्यंत आरोग्य शिबीर



आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये व्हिजन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे प्रसिद्ध हृदय विकार तज्ज्ञ डॉ. विनोद व्हिजन, डॉ. विक्रांत व्हिजन, नेत्र विकार तज्ज्ञ डॉ. सृष्टी व्हिजन यांच्यासह हॉस्पिटल स्टाफने रुग्णांची आरोग्य तपासणी केली. डॉ. विनोद व्हिजन म्हणाले की, या आरोग्य शिबीरात सर्व आजार व त्यावरील उपचार मोफत आहेत. यासाठी कॉलेज रोड येथील व्हिजन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये डॉ. विनोद व्हिजन, डॉ विक्रांत व्हिजन, डॉ सुष्ट्री व्हिजन, डॉ गुलशन तोलांनी यांच्या मार्गदर्शनाखाली हृदय विकाराशीं सबंधित सर्व शस्त्रक्रिया व उपचार मोफत करण्यात आले. या शिबिरात मोफत ४डी इकोही विनामूल्य करण्यात आल्याची माहिती डॉ. व्हिजन यांनी दिली. मुख्यमंत्री सहायत्ता निधी अंतर्गत ज्या रुग्णांना हृदय विकाराच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. या आरोग्य शिबीरला व्हिजन हॉस्पिटलचे अतुल धमाणे, डॉ सुनीता टाकहने,भुषण येवले, प्रशांत पवार, उषा उबाळे, प्रियंका गावीत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### धामणीच्या वैभव भोसलेचा सत्कार

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यातील धामणी येथील शेतकरी कुटुंबातील असलेल्या वैभव नारायण भोसले याने माध्यमिक शालांत परीक्षेत चांगल्या गुणांनी दहावीत उत्तीर्ण होऊन यश संपादन केल्याबद्दल राष्ट्रप्रथम सोशल फाऊंडेशनच्या वतीने ट्रॉफी देऊन त्याचा नुकताच सत्कार करण्यात आला. अपार कष्ट केलं तर यश हे नक्कीच पायाशी लोटांगण घालतं मात्र त्यासाठी सतत परिश्रम करणेही तितकेच गरजेचे असून जिद्द, चिकाटी आत्मविश्वसाच्या बळावर शेतकरी कुटुंबातील वैभवने चांगले गुण मिळवले याचा आनंद आहे, असे मत राष्ट्रप्रथम सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी सैनिक विजय कातोरे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी वैभवचे वडील नारायण राजेभोसले यांनी राष्ट्रप्रथम सोशल फाऊंडेशनचे आभार6 मानले. याप्रसंगी नारायण बाबा जाधव, माजी सैनिक किसन हंबीर, सुरेश जाधव, गोकुळ धोंगडे, बाळू सुरुडे आदींनी शुभेच्छा दिल्या.

# शेतकरी कर्जमाफी मिळेपर्यंत लढा सुरूच : बच्चू कडू

## प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग संघटनेतर्फे संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा

**नाशिक ।** सरकार ने ठराविक बड्या उद्योजकांना दीड लाख कोटींचे कर्ज माफ केले; परंतु शेतकरयांना कर्जमाफीसाठी टाळाटाळ होत असून, कर्जमाफी न केल्यास आंदोलनाची धार आधिक तीव्र करण्यात येईल, असे प्रतिपादन बच्चु कडू यांनी केले. शेतकरी कर्जमाफी मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असेही ते यावेळी म्हणाले.




प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग संघटनेच्यावतीने संताजी धनाजी पुरस्कार वितरण सोहळा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते मनोगत व्यक्त करताना बोलत होते. रावसाहेब थोरात सभागृहात कार्यकर्तेंना संताजी धनाजी पुरस्कार कडू यांच्या हस्ते वितरीत करण्यात आला. यावेळी त्यांनी कृषिमंत्र्यांच्या कार्यपद्धतीवरही टिकास्त्र सोडले.

### दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये अनुदानाची मागणी

दिव्यांगांना हात पाय नाहीत अशा दिव्यांगांना केवळ १५०० रुपये देतात व आमदार, मंत्र्यांचा पगार ५५००० वरुन साडेतीन लाख केला. दिव्यांगांना दरमहा सहा हजार रुपये अनुदान देण्यात यावे असेही कडू म्हणाले.

यावेळी दिव्यांग विजय पाटील यांनी देशभक्ती गीता वर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी निरीक्षक महेश बढे, निलेश वाटाणे, कुणाल राऊत उपस्थित होते. कार्यक्रमात पार्श्वनाथ जाधव, संदीप सूर्यवंशी, धर्मराज पाटील, स्वाती कुमावत, समाधान बागल, हरीश कुमावत, राजेंद्र पवार, संतोष मानकर, निंबा अहिरे, प्रमोद पाटील, महेंद्र सपकाळे, मंगलचंद जैन, तुकाराम अलट, दीपक जाधव, गोपाळ गावित यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. या प्रसंगी नाशिक जिल्हाप्रमुख अनिल भडांगे, जिल्हाध्यक्ष गणेश निंबाळकर, दिव्यांग जिल्हाध्यक्ष ललित पवार, जिल्हाध्यक्ष रवींद्र टीळे, चंद्रभान गांगुर्डे, सविता जाधव, बबलू मिर्झा, समाधान बागल, अमजद पठाण, अरुण पाचोरे नितीन गव्हाने, अमोल अडांगळे, शाहनवाज शेख, संजय तिवडे, नाना दोंदे, अनंता उपाध्ये, शाम गोसावी, शरद शिंदे, दत्तु बोडके, विलास कानकाट, दत्ता कांगणे अमोल फडताळे, तुषार खैरनार आदी उपस्थित होते.

# एटीएम फोडून १८.७६ लाखांची रोकड चोरी; अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको ।** अंबड औद्योगिक वसाहतीतील एक्सलो पॉईंटजवळ असलेल्या आयसीआयसीआय बँकेच्या एटीएममधून अज्ञात चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने मशीन फोडून तब्बल १८ लाख ७६ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना गुरुवारी (दि. २२ मे) उघडकीस आली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.




या प्रकरणी मयूर संजय महाजन (वय ३०, रा. फ्लॅट नं. ५०३, वृंदावन पार्क, पाथर्डी फाटा, नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे आयसीआयसीआय बँकेच्या एटीएम विभागाचे मॅनेजर असून त्यांना गुरुवारी सकाळी त्यांच्या सफाई कर्मचाऱ्याने माहिती दिली की एक्सलो पॉईंटजवळील बँकेच्या एटीएम मशीनचे दरवाजे तुटलेले दिसत आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी तात्काळ पोलिसांना कळवले. पोलिसांसमवेत महाजन यांनी घटनास्थळी पाहणी केली असता, तीन एटीएम मशीनपैकी एका मशीन (ATM ID: S1VDK002) चे दरवाजे गॅस कटरच्या सहाय्याने उघडण्यात आल्याचे आढळले. त्यामधील रोकड चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. सदर मशीनमध्ये १९ मे रोजी एकूण १० लाख रुपये भरले गेले होते. यापूर्वी ग्राहकांनी १.१५ लाख रुपये काढले होते. तर मशीनमध्ये एकूण १८.७६ लाख रुपये शिल्लक होते. ही संपूर्ण रक्कम चोरीस गेल्याची नोंद करण्यात आली आहे. चोरीस गेलेल्या रकमेचे स्वरूप ५०० रुपयांच्या ३७५२ नोटांमध्ये असून, चोरी कधी झाली याबाबतचे अंदाजे वेळ रात्री १२ ते सकाळी १० दरम्यान असल्याचे सांगण्यात आले आहे. अज्ञात चोरट्यांनी अत्यंत नियोजनपूर्वक गॅस कटरच्या साहाय्याने एटीएम मशीन फोडल्याचे दिसून येत आहे. या गंभीर प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिस उपनिरीक्षक शेवाळे हे या प्रकरणाचा तपास करत असून सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक पुरावे गोळा करून तपासाची दिशा ठरवली जात आहे. अंबड पोलीस पुढील तपास करत आहेत.

# राज्य सेवा हक्क आयोग करणार विविध विभागांची तपासणी

**नाशिक ।** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विविध विभागांमार्फत देणा-या येत असलेल्या सेवांच्या दर्जाच्या मूल्यमापनाची तपासणी राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक यांचेमार्फत करण्यात येत आहे.

यामध्ये अधिनियमातील तरतुदीनुसार विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा, अधिसूचित असलेल्या सेवांच्या माहितीचे फलक, विहीत नमुन्यातील अर्ज, अर्जदाराना द्यावयाच्या पोहोच पावत्या, अधिसूचित केलेल्या सेवांकरीता दिलेल्या कालमर्यादेचे पालन, विहीत केलेल्या नमुन्यातील नोंदवहया आदी मुदयांबाबत महालेखापालाच्या लेखापरीक्षा धर्तीवर हे सखोल परीक्षण करण्यात येणार असल्याची माहिती राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिली. राज्यातील जनतेस पारदर्शक पध्दतीने, कार्यक्षमरित्या आणि समयबद्ध सेवा उपलब्ध करण्यासाठी तसेच त्याअनुषंगाने अधिसूचित सेवा पुरविणारे शासनाचे विविध विभाग, सार्वजनिक प्राधिकरणे यांच्यात उत्तरदायीत्व निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र

## आयुक्त चित्रा कुलकर्णी यांची माहिती



लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 पारित केला असून या कायदयाची दि. 28 एप्रिल 2015 पासून महाराष्ट्र राज्यात सर्वत्र अंमलबजावणी करण्यांत येत आहे.

यामध्ये अधिनियमातोल तरतुदीनुसार विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा, अधिसूचित असलेल्या संर्वाच्या माहितीचे फलक, विहीत नमुन्यातील अर्ज, अर्जदाराना दयावयाच्या पोहोच पावत्या, अधिसूचित केलेल्या सेवांकरीता दिलेल्या कालमर्यादेचे पालन, विहीत केलेल्या नमुन्यातील नोंदवहया आदी मुद्दयांबाबत महालेखापालाच्या लेखापरीक्षण धर्तीवर हे सखोल परिक्षण करण्यात येणार आहे. दि. २० ते ३० मे २०२५ या कालावधीत राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक कार्यालयाचे पथकाने आदिवासी विकास विभाग या विभागाचे लेखापरीक्षण सुरु केलं आहे. त्यानुसार दि. २० मेपासून परीक्षणास सुरुवात झाली आहे. दि. ३३ मे रोजी राज्य सेवा हक्क आयोग, नाशिक विभागाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी आदिवासी विकास विभागास भेट देऊन परीक्षणात आढळून आलेल्या त्रुटींबाबत आयुक्त आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड तसेच इतर अधिकाऱ्यांशी चर्चा केली. बनसोड यांनी परीक्षणातील त्रुटींबाबत तात्काळ पूर्तता करण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले. अशाच प्रकारे नजिकच्या काळात नाशिक महानगरपालिका, परिवहन विभाग, भूमिअभिलेख विभाग तसेच इतर कार्यालयाची सखोल तपासणी आयोगाकडून करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

### शासकीय अंध शाळेचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**नाशिक ।** शासकीय अंध शाळा, नाशिक येथील दृष्टी दिव्यांग विद्यार्थ्यांनी शिकण्याची जिद्द व मेहनतीने इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये यशराज अरूण शिंदे याने 92.20 टक्के गुण संपादन करून के.जे. मेहता हायस्कूलमधून प्रथम क्रमांक मिळविला असून यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून प्रशासकीय सेवेत प्रवेश मिळविणे हे त्याचा मानस आहे, अशी माहिती शासकीय अंधशाळा अधीक्षक यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. दहावी परीक्षेत यशराज शिंदेसह शासकीय अंध शाळेतील सोहम पोपट गांगुर्डे – 78.40 टक्के, पुष्कर कुंदन टोके- 68.20 टक्के, शंतनु ज्ञानेश्वर पवार- 63.60 टक्के गुण मिळविले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांनी एकात्मिक शिक्षण के.जे. मेहता हायस्कूल, नाशिकरोड येथे शिक्षण घेतले असून सर्व विद्यार्थी शासकीय अंधशाळा, नाशिकच्या वसतिगृहात इयत्ता पहिली ते दहावी पर्यंत वास्तव्यास राहून अध्ययन करीत होते.

# बालांगण

## रेखा सुरेख रांगोळी



दोस्तांनो, कोणत्याही मंगलप्रसंगी दारापुढे रांगोळी काढली जाते. तेव्हा तुम्हीही दारापुढे छानशी रांगोळी काढू शकता. सहज, सोपी आणि झटपट रांगोळी कशी काढायची? पाहु या...

**साहित्य:** रंगीत तांदूळ किंवा रंगीत वाळू... मित्रांनो, रांगोळीसाठी रंगीत मीठही वापरता येईल. हे मीठ घरच्या घरी तयार करता येईल. यासाठी घरातलं मीठ घ्या. त्यात थोडे खायचे रंग मिसळा. झालं तुमचं रंगीत मीठ तयार! या मिठाचा वापर करूनही छान रांगोळी तयार करता येईल. पांढरा खडू, वर्तमानपत्राचा कागद, गडद रंगाचा मोठा कागद,गम, ग्लिटर

**कृती:** गडद रंगाचा कागद घ्या. त्यावर खडूने आउटलाईन काढून घ्या.

करून तर पहा

आता कागदावर पांढरा गम ओता. त्यावर रंगीत मीठ किंवा वाळूने डिझाईन काढा. एका वेळी एकच रंग घ्या. उर्वरित रंग वर्तमानपत्रावर झटकून टाका. रंगसंगतीसाठी तुम्ही ग्लिटरचा वापर करू शकता. अशाच प्रकारे तुम्ही जमिनीवरही ही रांगोळी काढू शकता. जमिनीवर आवडीची नक्षी काढा. त्यात रंगीत वाळू किंवा मीठ भरा. यासाठी रंगवलेल्या तांदळांचाही वापर करता येईल.

## सॅल्यूट आणि परंपरा

छोट्या दोस्तांनो, कल्पना करा की, भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाचे जवान सलाम करतात तेव्हा हात वर करण्याची त्यांची पद्धत वेगळी असते. यामागे केवळ परंपरा नाही तर एक विचार आणि इतिहास लपलेला आहे. आज या फरकाबद्दल थोडे तपशीलवार समजून घेऊया.

**आर्मी सॅल्यूट –** भारतीय सैन्याचे जवान सलामी देतात तेव्हा हाताचे तळवे जमिनीकडे झुकलेले असतात. सैनिक ज्या हाताने बंदूक किंवा इतर कोणतेही शस्त्र धरतात त्याच हाताने सलाम करतात. अभिवादन करताना त्यांची सर्व बोटे उघडी असतात. यामागे एक ऐतिहासिक कारणही आहे. प्राचीन काळी युद्धे तलवारी आणि शस्त्रांनी लढली जात असत. तेव्हा तळहात खाली दाखवण्याचा अर्थ सैनिकाच्या हातात शस्त्र नाही असा होत असे. हात रिकामे असणाऱ्या सैनिकावर विश्वास ठेवता येत असे.




**नेव्ही सॅल्यूट –** भारतीय नौदलाची सलामी इतर सैन्यांपेक्षा थोडी वेगळी आहे. यामध्ये तळहात शरीराकडे वळवला जातो. सैनिक उजवा हात ९० अंशाच्या कोनात खाली वाकलेला ठेवतो. याचे कारणही नौदलाच्या परंपरेत लपलेले आहे. पूर्वी खलाशी जहाजे चालवण्यासाठी कठोर परिश्रम करायचे. बहुतेकदा त्यांचे हात खराब असायचे. अशा परिस्थितीत समोरच्या व्यक्तीला अपमान वाटू नये म्हणून त्यांनी उघड्या हातांनी नमस्कार करणे टाळले आणि तळहाता आत ठेवत नमस्कार करण्याची परंपरा स्वीकारली. ही पद्धत अजूनही आदर, नम्रता आणि शिस्तीचे प्रतीक आहे.

**वायुसेना सॅल्यूट –** भारतीय हवाई दलाचा सॅल्यूट सर्वात स्टायलिश आणि अचूक असतो. यामध्ये तळहात सरळ असतो आणि जमिनीपासून सुमारे ४५ अंशांच्या कोनात वर उचलला जातो. हवाई दलाच्या काम करण्याच्या पद्धतीप्रमाणेच हा दृष्टिकोन हुशारी, वेग आणि अचूकता दर्शवितो. हवाई दलाची सलामी जलद, चपळ आणि आत्मविश्वासाने भरलेली असते.

माहिती असू द्या

थोडक्यात तिन्ही सैन्यांच्या कार्यशैली, इतिहास आणि मूल्यांनुसार त्यांची अभिवादन करण्याची पद्धत देखील वेगळी आहे. सैन्य जमिनीवर, नौदल समुद्रात आणि हवाई दल आकाशात लढते. त्यांचे प्रशिक्षण, कामाचे वातावरण आणि परंपरा देखील भिन्न आहेत आणि हा फरक त्यांच्या सॅल्यूटमध्ये स्पष्टपणे दिसून येतो.

## आगळे विश्व

अजब गजब

दोस्तांनो, दोस्तांनो, पृथ्वीवर विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, किटक आहेत. कोणाचा आकार वेगळा तर कोणाची रचना वेगळी. काही सजीवांचं रक्त पिवळ्या, हिरव्या रंगाचं असतं तर काही सजीवांना पायच नसतात. पृथ्वीवर सजीवांच्या ८७ लाख प्रजाती अस्तित्वात असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या प्रजातींमधले काही सजीव चित्र-विचित्र आहेत. त्यांचा विचारही आपण करू शकत नाही. त्यांचं असे सजीव अस्तित्वात आहेत यावरही आपला विश्वास बसू शकणार नाही, अशाच काही सजीवांविषयी...



✻ स्टोव्ह पाईप स्पंज नावाचा सजीव समुद्रात आढळतो. या सजीवाचा आकार ट्यूबलाईटसारखा होतो. तसंच तो पाच फूट तीन इंचांपर्यंत उंच होऊ शकतो. हा सजीव शेकडो वर्षं जगू शकतो.



✻ ब्लॉब फिश हा समुद्रात तब्बल २४०० फूट खोल राहणारा मासा आहे. समुद्राच्या पाण्यापेक्षा कमी वजन असल्याने तो पाण्यात अगदी सहज तरंगू शकतो.



✻ थोर्नी डेव्हिल नावाची एक पाल आहे. ती ऑस्ट्रेलियातच आढळते. तिच्या संपूर्ण शरीरावर काटे असतात. त्यामुळे खूपच धोकादायक बनली आहे. तिच्या डोक्यावरचा काटा खूप मोठा असतो. हा काटा म्हणजे दुसरं डोकं आहे की काय, असं वाटतं. ही पाल दिवसभरात हजारो मुंग्या खाऊन टाकते.



✻ दक्षिण तसंच मध्य अमेरिकेतल्या काही देशांमध्ये पोटू नावाचा पक्षी आढळतो. याच्या त्वचेचा रंग खोडाच्या लाकडासारखा असतो. मान हे या प्राण्यांचं मुख्य वैशिष्ट्य आहे.



✻ जपानी स्पायडर क्रॅब हा सुद्धा अनोख सजीव. हा सजीव कोळ्यासारखा दिसत असला तरी तो खेकडा आहे. या खेकड्याचं वजन १८ किलोपर्यंत असू शकतं. तो १०० वर्षांपर्यंत जगू शकतो.

✻ ऑस्ट्रेलिया आणि न्यू गिनीमध्ये विशिष्ट प्रकारची पाल आढळते. या पालीला फ्रिल नेक्ड लिझार्ड असं म्हटलं जातं. पालीच्या मानेजवळ पंखांसारखा एक भाग असतो. यामुळे ही पाल वेगळी वाटते.

## शेफ व्हायचंय?

छोट्या दोस्तांनो, तुम्हाला छान छान पदार्थ खायला आवडतात का? हॉटेलमध्ये गेल्यावर मेनू कार्ड हातात घेऊन तुम्हीच खाण्याची ऑर्डर देता का? आपणही एखादा पदार्थ बनवून बघावा,असं तुम्हाला वाटतं का? हॉटेलमध्ये एवढे पदार्थ कोणाच्या देखरेखीखाली तयार होतात, असा प्रश्न पडला आहे का? मुलांनो, हे सगळे पदार्थ शेफच्या मार्गदर्शनाखाली तयार होतात. शेफ या करीअरला आता चांगलंच ग्लॅमर आहे. शेफ बनून तुम्ही मोठ्या हॉटेलमध्ये नोकरी करू शकता. शेफ बनण्यासाठी काय करायला हवं, याविषयी...



शेफ बनण्यासाठी तुमच्याकडे काही कौशल्यं असायला हवीत. स्वयंपाकाची आवड, चवींची जाण, खाण्या-पिण्याची आवड, उत्तम संवादकौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, आत्मविश्वास, कल्पकता, एकाच वेळी विविध भूमिका पार पाडण्याची क्षमता, नव्या गोष्टी शिकण्याची वृत्ती, स्वयंपाकघरात काम करण्याची तयारी अशी कौशल्यं असल्यास तुम्ही या क्षेत्राची निवड करू शकता.

आपल्या देशात शेफचं ट्रेनिंग देणाऱ्या अनेक संस्था आहेत. या संस्थांमधून वैयक्तिक प्रशिक्षण घेतलं तर तुम्हाला बरेच लाभ होऊ शकतात. तुमच्याकडे पदवी असेल तर भविष्यात त्याचा लाभ होऊ शकतो. पदवी, पदविका तसंच प्रमाणपत्र अभ्यासक्रम आपल्या देशात उपलब्ध आहेत. यात पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांना जास्त महत्त्व दिलं जातं. हे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही सखोल ज्ञान मिळवू शकता. कलिनरी आर्टसमध्ये बीए, हॉटेल मॅनेजमेंटची पदवी, केटरिंगचा डिप्लोमा असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

कोण होणार?

## काय फरक आहे?

महत्त्वाचे काही...

छोट्या मित्रांनो, कोणी तुम्हाला वकील आणि बॅरिस्टर यांच्यात काय फरक आहे, असे विचारले तर काय उत्तर द्याल? जाणून घेऊ या.

'वकील' हा शब्द कायद्याचा अभ्यास केलेल्या म्हणजेच एलएलबी पदवी प्राप्त लोकांसाठी वापरला जातो. तो न्यायालयात खटला लढत असो वा नसो... म्हणजेच एखाद्याने कायद्याचा अभ्यास केला असेल तर त्याला 'वकील' म्हणतात. उदाहरणार्थ एखादी व्यक्ती एलएलबी पदवी घेतल्यानंतर एखाद्या कंपनीत कायदेशीर सल्लागार बनली आणि न्यायालयात खटले लढत नसली तरीही तो 'वकील' असतो. एखादा वकील बार कौन्सिलमध्ये नोंदणीकृत होतो आणि त्याला खटला लढण्याची परवानगी मिळते तेव्हा तो 'ॲडव्होकेट' होतो.

'बॅरिस्टर' हा शब्द मात्र ब्रिटिश कायदेशीर व्यवस्थेतून आला आहे. एखादा भारतीय विद्यार्थी इंग्लंडला जातो आणि कायद्याचा अभ्यास करतो (विशेषतः 'बार ॲट लॉ'), तेव्हा त्याला 'बॅरिस्टर' म्हणतात. आपल्या सर्वांना माहीत आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधी वयाच्या १९ व्या वर्षी बॅरिस्टर म्हणून शिक्षण घेण्यासाठी भारत सोडून लंडनला गेले होते. म्हणजे वकील आणि बॅरिस्टर हे एकच आहेत पण भारत आणि इंग्लंडमध्ये या दोन्ही नावांमध्ये फरक आहे.

## नेटवर्कची समस्या आहे?

टेक फन

मुलांनो, स्मार्टफोन हा आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. एआय मुळेतर हे उपकरण आणखी शक्तिशाली बनले असल्याचे तुम्ही जाणता. परंतु आजही मोबाईल फोनमध्ये नेटवर्क समस्या दिसून येतात. नेटवर्क समस्यांची अनेक कारणे असतात. पण ती जाणली तर तुमची समस्या झटक्यात दूर होऊ शकते. कसे ते पाहू या.

✻ डिव्हाइसमध्ये एकाच नेटवर्क ऑपरेटरचे दोन सिम कार्ड वापरत असाल, तर कधीकधी नेटवर्क क्लॅशमुळे नेटवर्क मिळण्यात समस्या येऊ शकते. अशा वेळी तुम्ही एक सिम काही काळासाठी बंद करून तपासले पाहिजे. याच्या मदतीने तुम्हाला नेटवर्कची समस्या दुसऱ्या सिममुळे होत आहे की नाही हे समजेल.



✻ नेटवर्क प्रकार बदलून देखील नेटवर्क समस्येचे निराकरण करू शकता. यासाठी, सर्वप्रथम मोबाईल सेटिंग्ज मध्ये मोबाईल नेटवर्क प्रेफर्ड नेटवर्कवर जावे लागेल. यानंतर, तुम्ही येथे ५ जी/४जी/३जी/२जी मॅन्युअली बदलू शकता आणि कोणते नेटवर्क स्थिरपणे काम करत आहे ते पाहू शकता.

✻ कधीकधी फोनमधील एखाद्या सॉफ्टवेअर समस्येमुळे नेटवर्क रिफ्रेश होत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही 'नेटवर्क सिग्नल रिफ्रेशर' सारखे ॲप्स वापरू शकता. हे ॲप्स मोबाईलला जवळच्या टॉवर्सवरून चांगले नेटवर्क मिळवण्यास मदत करू शकते. जुन्या उपकरणांमध्ये नेटवर्क रिफ्रेश न होण्याची समस्या सर्वात सामान्य आहे.

## ठिपके जुळवा



## चष्मा ठेवा चकाचक

आजकाल मुलामुलींना अगदी लहान वयापासून चष्मा लागतो. पण चष्मा नेहमी स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे. अनेकदा घाईघाईत चष्मा कापडाने किंवा इतर कशाने तरी पुसतो. पण यामुळे तो स्वच्छ होण्याऐवजी अधिक खराब होतो. तेव्हा चष्मा नेहमी कसा स्वच्छ, चमकता ठेवावा हे आज जाणून घेऊ या.

स्वच्छ करण्यासाठी प्रथम चष्मा कोमट पाण्याने धुवा. यामुळे काचेवर ओरखडे राहणार नाहीत. आता बोटांवर डिशवॉश घ्या आणि लेन्स तसेच फ्रेमवर हळूवारपणे घासा. नंतर पुन्हा एकदा चष्मा कोमट पाण्याने धुवा. तो फक्त मायक्रोफायबर कापडाने पुसा. पेपर नॅपकीन किंवा घातलेल्या कपड्याने, साध्या कापडाने कधीही तो पुसू नका. असे केल्यास चष्म्यावर ओरखडे उठू शकतात.

साबण आणि कोमट पाण्याव्यतिरिक्त, चष्म्याच्या लेन्स स्वच्छ करण्यासाठी इतर उत्पादनेही उपलब्ध आहेत. जसे की, त्यासाठी ओलसर लेन्स वाइप्स उपलब्ध आहेत. ते तुम्ही कधीही आणि कुठेही वापरू शकता. लेन्स क्लिनिंग सोल्यूशन देखील वापरता येईल. क्लिनरसाठी नेहमी मायक्रोफायबर कापडच वापरा.



असे का करावे

फक्त चष्म्याची काचच नाही तर चौकटही स्वच्छ करणे आवश्यक आहे कारण फ्रेम सतत त्वचेच्या संपर्कात असते. स्वाभाविकच धूळ आणि घामामुळे ती जंतूंचे घर बनते. म्हणूनच फ्रेम आणि काच नियमितपणे स्वच्छ करा. काही मुले घाईघाईत चष्म्याच्या काचेवर थुंकून तो स्वच्छ करतात. ही अगदी चुकीची पद्धत आहे. यामुळे चष्मा अधिक खराब आणि वापरण्यास अयोग्य होतो. शिवाय त्यावर जंतूचे प्रमाण कम ालीचे वाढते. अशा अस्वच्छ चष्म्यावर अत्यंत धोकादायक बॅक्टेरिया वाढू शकतात आणि स्टेफिलोकोकलसारख्या संसर्गाचा धोकाही वाढतो. असे केल्यास डोळ्यामध्ये संक्रमण होते. एवढेच नाही तर चष्म्याचे नोजपॅड आणि कानाच्या क्लिपचा भागही सर्वात जास्त संक्रमित भाग असतो. म्हणूनच चष्मा वापरत असाल तर तो नीट स्वच्छ करा. कंटाळा करणे आरोग्यास घातक ठरेल.

## चित्र रंगवा



### पेट केअर

#### प्राण्यांना साप चावला तर...



दोस्तांनो; साप कधीही, कोणालाही चावू शकतो. पण यामुळे गोंधळून जाऊ नका. तुमच्या लाडक्या पाळीव प्राण्याला साप चावला तर घाबरून जाऊ नका. प्राण्याला सापापासून लांब न्या, जमिनीवर ठेवा. शांत करा. त्याला स्थिर ठेवा. जखमेवर बँडेज बांधा. चावलेल्या ठिकाणी पट्टा असेल तर तो काढून टाका. डॉक्टरांकडे न्या.

### खादाडी

#### फ्रेंच टोस्टने भागेल भूक!



छोट्या दोस्तांनो, भूक लागली की तुम्ही फ्रेंच टोस्ट बनवू शकता. यासाठी ब्रेडचे दोन स्लाईस, एक अंडं, पाव कप दूध, थोडी दालचिनी हे पदार्थ घ्या. गॅसवर तवा ठेवा. दूध, अंडं आणि वेलची एकत्र करा. ब्रेडचा तुकडा घ्या. तो अंड्यात बुडवा. आता दुसरी बाजू अंड्यात बुडवा. हा ब्रेड तव्यावर ठेवा. आता दुसरा ब्रेडही अशाच प्रकारे बुडवा. दोन्ही ब्रेड तव्यावर ठेवा. गॅस मध्यम आचेवर ठेवा. एक बाजू ब्राउन झाली की ब्रेड उलटा. दुसरी बाजू ब्राउन होऊ द्या. झाला, तुमचा फ्रेंच टोस्ट तयार.

### स्टडी टिप्स

#### वेगवेगळे विषय अभ्यासा

मुलांनो, अभ्यास करण्याच्या काही शास्त्रीय पद्धतीही आहेत. या पद्धतींचा तुम्हाला फायदा होऊ शकतो. मुलांनो, तुम्ही दिवसभरात एकाच विषयाचा अभ्यास करता. त्याऐवजी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करा. समजा तुम्ही गणित, इतिहास, विज्ञान आणि भूगोल या विषयांची तयारी करत आहात. मग या सगळ्या विषयांचा थोडा थोडा अभ्यास करा. यामुळे तुमचा अभ्यास खूप लवकर होईल. एकाच विषयाचा अभ्यास केल्याने तुमचा गोंधळ होऊ शकतो. म्हणूनच वेळेचं नीट नियोजन करा.



### योगा टाईम

#### रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी...

मुलांनो, तुम्हाला राग येतो का? खूप राग येणंही चांगलं नसतं. रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी काही योगासनं आणि मुद्रा करता येतील. उनमामी मुद्रेमुळे तुमचं मन शांत होईल. ही मुद्रा खूप सोपी आहे. खूप राग येत असेल तर ही मुद्रा नियमितपणे करा. ही मुद्रा करण्यासाठी मांडी घालून बसा. डोळे बंद करा. आपलं सगळं लक्ष भुवयांच्या मध्यभागी केंद्रित करा. काही वेळ या स्थितीत रहा. .



महासागर





# शेअर बाजारात पुन्हा एकदा तेजी

## सेन्सेक्स 769 अंकांनी उसळला



**मुंबई, दि. २३ प्रतिनिधी**

भारतीय शेअर बाजारांनी गुरुवारच्या घसरणीनंतर आज २३ मे रोजी शानदार पुनरागमन केले. सेन्सेक्स ७६९ अंकांनी वधारला. निफ्टी वाढला आणि २४,८५० च्या वर गेला. जागतिक बाजारपेठेतील सकारात्मक संकेत आणि अमेरिकन बाँड उत्पन्नातील घट यामुळे बाजारातील तेजीला पाठिंबा मिळाला. बँकिंग, आयटी आणि मेटल शेअर्समध्ये सर्वात मोठी तेजी दिसून आली. यामुळे आज एका दिवसात गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ३ लाख कोटी रुपयांची वाढ झाली.

बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.५० टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक ०.४५ टक्क्यांनी वधारून बंद झाला. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ७६९.०९ अंकांनी वधारून ८१,७२१.०८ वर बंद झाला. तर निफ्टी २४३.४५ अंकांनी वाढून २४,८५३.१५ वर बंद झाला. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज २३ मे रोजी ४४१.८८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले, जे मागील दिवशी म्हणजेच गुरुवार, २२ मे रोजी ४३८.९८ लाख कोटी रुपये होते. सूचीबद्ध कंपन्यांचे

**सेन्सेक्स 81,721**

**निफ्टी 24,853**

बाजार भांडवल आज सुमारे २.९० लाख कोटी रुपयांनी वाढले आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी २९ शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये इन्फोसिसच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ३.६० टक्के वाढ झाली. यानंतर, भारती एअरटेल, अल्ट्राटेक सिमेंट, इटरनल आणि कोटक महिंद्रा बँकेचे शेअर्स २.०९ टक्क्यांपासून २.४२ टक्क्यांपर्यंत वाढून बंद झाले. दुसरीकडे, सेन्सेक्समधील फक्त एकच शेअर सन फार्मा आज २.१४ टक्क्यांनी घसरून बंद झाला.

मुंबई शेअर बाजारात वाढीसह बंद झालेल्या शेअर्सची संख्या जास्त होती. आज एकूण ४,१०६ शेअर्सची खरेदी-विक्री झाली. यापैकी २,३६१ शेअर्स वाढीसह बंद झाले. तर १,५८९ शेअर्समध्ये घसरण झाली. १५६ शेअर्स कोणत्याही चढ-उतारांशिवाय स्थिर राहिले. याशिवाय, आजच्या व्यवहारात ९८ शेअर्सनी ५२ आठवड्यांच्या नवीन उच्चांकाला स्पर्श केला. तर २३ शेअर्स ५२ आठवड्यांच्या नवीन नीचांकी पातळीवर पोहोचले.

# नॉर्थ -ईस्टमध्ये मुकेश अंबानींची 75 हजार कोटींच्या गुंतवणुकीची घोषणा

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे सुरु असलेल्या रायझिंग नॉर्थ-ईस्ट इन्व्हेस्टर्स समिट २०२५ मध्ये शुक्रवारी रिलायन्स इंडस्ट्रीज आणि अदानी समुहाने ईशान्य भारतात गुंतवणुकीबाबत मोठी घोषणा केली. रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी, ईशान्य भारतात पुढील ५ वर्षांत ७५ हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे सांगितले. तर अदानी समुहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी, अदानी समूह पुढील १० वर्षांत ईशान्य भारतात ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली.

या समिटवेळी, मुकेश अंबानी यांनी अरुणाचल प्रदेश आणि नागालँडसह ईशान्येकडील राज्यांसाठी त्यांचे धोरणात्मक व्हिजन सादर केले. "भविष्यात, मी हे प्रदेश सिंगापूरसारख्या शेजारील देशांच्या यशाची प्रतिकृती बनलेला पाहू शकतो," असे अंबानी यांनी म्हटले.

दरम्यान, मुकेश अंबानी यांनी ईशान्येला एक नवीन नाव दिले आहे. त्यांनी बोलताना ईशान्येकडील आठ राज्यांचा 'अष्टलक्ष्मी' असा उल्लेख केला. यावेळी मुकेश अंबानी यांनी 'ऑपरेशन सिंदूर'साठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले.



रिलायन्स इंडस्ट्रीज ईशान्येकडील राज्यांत गुंतवणूक दुपटीने वाढवेल. सर्व शाळा, रुग्णालये आणि घरांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आणेल. तसेच या प्रदेशात सौरऊर्जेची निर्मिती वाढवणार आहे, असेही मुकेश अंबानी यांनी सांगितले.

ईशान्य भारतातील रिलायन्सची सध्याची गुंतवणूक ३० हजार कोटी रुपये आहे. आता ही गुंतवणूक ७५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याची त्यांची योजना आहे.

अदानी समूह पुढील १० वर्षांत ईशान्य भारतात ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे, अशी घोषणा अदानी समुहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी शुक्रवारी दिल्लीतील रायझिंग नॉर्थ-ईस्ट इन्व्हेस्टर्स समिटमध्ये केली. "आम्ही तीन महिन्यांपूर्वी आसाममध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचे सांगितले होते. मी पुन्हा घोषणा करतो की अदानी समूह पुढील १० वर्षांत संपूर्ण ईशान्य भारतात ५० हजार कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करेल." असे अदानी म्हणाले.

अदानी पुढे म्हणाले, "गेल्या दशकात, ईशान्येकडील प्रदेशात भारताच्या विकासाच्या गाथेचा एक नवीन अध्याय उलगडत आहे. विविधता, लवचिकता आणि वापर न झालेल्या क्षमतेची ही एक गोष्ट आहे. या उदयामागे एका नेत्याची दूरदृष्टी आहे जो सीमेच्या मर्यादा मानत नाही. केवळ सुरुवात करतो. पंतप्रधान, तुम्ही जेव्हा पूर्वेकडे जलद आणि प्रथम लक्ष द्या, असे म्हटले, तेव्हा तुम्ही ईशान्येचे लक्ष वेधले."

# भारत पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळणार, ईएटीएफकडे जाणार

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

कर्जे आणि बेलआउट पॅकेज घेऊन दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने त्याची आर्थिक कोंडी करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी भारत आता जागतिक बँक आणि टेरर फंडिंगवर नजर ठेवणाऱ्या फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सशी (FATF) संपर्क साधण्याच्या तयारीत आहे. भारत आता जूनमध्ये पाकिस्तानच्या २० अब्ज डॉलर्सच्या बेलआउट पॅकेजच्या मंजुरीवर पुनर्विचार करण्यास जागतिक बँकेला सांगणार आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली.




पाकिस्तानला पुन्हा ग्रे लिस्टमध्ये टाकण्यासाठी भारत एफएटीएफकडे सक्रियपणे पाठपुरावा करणार आहे. ज्यामुळे पाकिस्तानच्या आर्थिक व्यवहारांची अधिक चौकशी होईल. परिणामी, परदेशी गुंतवणूक आणि भांडवल प्रवाहावर निर्बंध लादले जाऊ शकतात.

पाकिस्तानला जून २०१८ मध्ये एफएटीएफच्या 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकण्यात आले होते. दरम्यान, पाकिस्तान सरकारने टेरर फंडिंग रोखण्याचे आश्वासन दिल्यानंतर ऑक्टोबर २०२२ मध्ये त्यांना 'ग्रे लिस्ट'मधून काढून टाकण्यात आले. त्यावेळी पाकिस्तानने दहशतवादी गटांशी संबंध असलेल्यांना तुरुंगात टाकल्याची आणि त्यांची मालमत्ता जप्त केल्याचा दावाही केला होता.

**१ अब्ज डॉलर्सच्या बेलआउट पॅकेजलाही भारताचा तीव्र विरोध**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने ९ मे रोजी पाकिस्तानच्या १ अब्ज डॉलर्सच्या बेलआउट पॅकेजला मंजुरी दिली होती. दरम्यान, भारताने आयएमएफच्या या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला होता. सूत्रांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या बेलआउट पॅकेजमुळे भारताने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# पीडित तरुणीचे आरोपीवर प्रेम, लग्नही केले

## सर्वोच्च न्यायालयाला बदलावा लागला आपलाच निर्णय

**नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने आज न्यायासाठी आपलाच निर्णय बदलला. न्यायालयाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीला दिलेली शिक्षा रद्द केली. दोन्ही पक्षांच्या परस्पर संमतीमुळे हे प्रकरण कोलकाता उच्च न्यायालयाने निकाली काढले होते, परंतु ऑगस्ट २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयावर टीका करत खटला चालवण्याचे आदेश दिले होते.

आपल्या नोकरीच्या शेवटच्या दिवशी दिलेल्या निकालात न्यायमूर्ती अभय एस ओका यांनी आदेश देताना म्हटले की, कायदा ज्या मुलीला पीडित मानतो, ती स्वतःला पीडित



मानत नाही. तिला आरोपी खूप आवडतो, दोघेही विवाहित असून, त्यांना एक मूलही आहे. जर मुलीला खरोखरच काही त्रास झाला असेल, तर तो कायदेशीर प्रक्रियेमुळे झाला आहे. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालय कलम १४२ अंतर्गत आपल्या विशेष अधिकारांचा वापर करत कनिष्ठ न्यायालयात प्रलंबित असलेला खटला बंद करत आहे.

१८ ऑक्टोबर २०२३ रोजी कोलकाता उच्च न्यायालयाने एका अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात निकाल दिला. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चित्तरंजन दास आणि पार्थसारथी सेन यांनी अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषणाच्या आरोपातून मुलाला निर्दोष मुक्त केले होते. दोघांमधील संबंध संमतीने असल्याने न्यायाधीशांनी हा निर्णय दिला. पण या निर्णयात न्यायाधीशांनी तरुणांना सल्ले दिले होते, ज्यामुळे बराच वाद झाला.

त्या निर्णयात उच्च न्यायालयाने म्हटले होते की, मुलींनी त्यांच्या लैंगिक इच्छेवर नियंत्रण ठेवावे आणि २ मिनिटांच्या आनंदावर लक्ष केंद्रित करू नये. उच्च न्यायालयाने मुलांनाही सल्ला दिला होता की, त्यांनी मुलींच्या प्रतिष्ठेचा आदर करावा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाची माहिती मिळाल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली. सर्वोच्च न्यायालयाने या खटल्याची सुनावणी In Re: Right to Privacy of Adolescen या नावाने केली.

२० ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला. सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात उच्च न्यायालयाने केलेल्या टिप्पण्यांवर टीका केली होती आणि त्या अवांछित असल्याचे म्हटले होते. तसेच, आरोपीला POCSO कायद्यांतर्गत दोषी ठरवणे योग्य असल्याचेही म्हटले अन् शिक्षेचा निर्णय राखून ठेवला होता. याबाबत एक समिती स्थापन करण्यात आली आणि अहवाल मागवण्यात आला.

आता समितीचा अहवाल पाहिल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे की, मुलीचे आरोपीवर प्रेम आहे, त्यांनी लग्न केले असून, त्यांना एक लहान मुलगीदेखील आहे. या प्रकरणात आरोपीला तुरुंगात ठेवणे न्यायाच्या हिताचे ठरणार नाही. यामुळेच आता कोर्टाने आपला निर्णय बदलला आहे.

# भर संसदेत पाकिस्तानी नेत्याने स्वतःच्याच सरकारची पोलखोल केली

**इस्लामाबाद, दि. २३ वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे फिरायला आलेल्या लोकांवर गोळीबार करून, त्यांची हत्या करण्यात आली. या हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' करून पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची तळे उद्ध्वस्त केली. भारताच्या या कृतीने अस्वस्थ झालेल्या पाकिस्ताननेही आपल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी भारतातील अनेक भागात हल्ला करण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय संरक्षण यंत्रणेने सर्व हल्ले हाणून पाडले.

प्रत्युत्तरादाखल भारतानेही पाकिस्तानच्या ११ हवाई तळांना लक्ष्य केले आणि ते पूर्णपणे उद्ध्वस्त केले. पाकिस्तानने भारतीय लष्करी कारवाईला खोटे ठरवण्याचा प्रयत्न वारंवार केला असला तरी, भारताने याचे सर्व पुरावे सादर केले आहेत. या दरम्यान पाकिस्तानमधून असे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत, ज्यात त्यांनी स्वतः हल्ल्याची कबुली दिली आहे. आता देखील एका पाकिस्तानी नेत्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये त्याने स्वतःच्याच सरकारची कानउघडणी केली आहे.

एका पाकिस्तानी सिनेटरचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, यामध्ये त्याने असा दावा केला आहे की, भारतीय हवाई दलाने केवळ पाकिस्तानात प्रवेश केला नाही तर पाकिस्तानच्या एअरबेसला लक्ष्य करून तो नष्ट केला. व्हायरल व्हिडीओमध्ये, पाकिस्तानी सिनेटर म्हणत आही की, "भारताने चकलाला एअरबेसवर येऊन हल्ला केला, आमचे आर्मी जीएचक्यू त्याच्या अगदी जवळ होते. पण, कोणीही विचारत नाही की भारत इतक्या आत कसा आला."

# करिअरची निवड करताना

**दरवर्षी दहावी आणि बारावीचे निकाल लागले कि तमाम विद्यार्थी हे आनंदात असतात. परंतु आजच्या करिअरच्या अफाट विश्वात आपल्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने नेमके कोणते करिअर निवडावे याबाबत मात्र विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड संभ्रम असतो. अनेक विद्यार्थ्यांची अवस्था हि गोंधळलेली असते. दहावी बारावी नंतर करिअरच्या दृष्टीने सूचक मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक डॉ. सुचित्रा सुर्वे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

साप्ताहिक संवाद

१]दहावी बारावीचे निकाल लागल्यानंतर करिअर च्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा गोंधळ का उडतो?

करिअर मधील विद्यार्थ्यांचा गोंधळ हा विविध कारणामुळे उडतो. विद्यार्थ्यांमध्ये स्वतःच्या आवडी,मूल्ये आणि कौशल्याबद्दल स्पष्टतेचा अभाव असतो. वेगवेगळ्या करिअर मार्गांबद्दल अपुरे ज्ञान,चुकीचे करिअर निवड करण्याची भीती या गोष्टींचा यामध्ये समावेश असतो. आजच्या काळात करिअरचे इतके सारे पर्याय उपलब्ध आहेत,कि यातून नेमका कोणता मार्ग चांगला?याबाबत विद्यार्थ्यांचा गोंधळ उडणं स्वाभीक आहे. त्यांच्या पालकांच्या पिढीत डॉकटर,इंजिनिअर,शिक्षक,सरकारी नोकरी,अशा मर्यादा होत्या. मात्र आजच्या काळात डेटा विश्लेषक,कन्टेन्ट क्रिएटर,क्रीडा मानसशात्रज्ञ,एथिकल हॅकर,वन्यजीव छायाचित्रकार असे असंख्य पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत.

२]योग्य करीअर निवडताना विद्यार्थ्यांनी कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात?

करिअर निवड करताना विद्यार्थ्यांनी इतरांच्या आधी स्वतःकडे लक्ष द्यायला हवे. तुम्हाला नेमके काय आवडते?कोणत्या विषयात मनापासून रस आहे?तो विषय निवडताना तणाव तर नाही ना? तुम्हाला संशोधनात रुची आहे?कि वैद्यक शास्त्रात?गणिताची आवड असेल तर अभियांत्रिकी क्षेत्र योग्य वाटते का?असे प्रश्न प्रत्येकाने आपल्या मनाला विचारून मगच आपल्या भवितव्याच्या दृष्टीने ते करिअर निवडायला हवे. करीरार बद्दल अवास्तव अपेक्षा न बाळगता योग्य त्या व्यावसायिक दृष्टीने पात्र सल्लागाराकडून मार्गदर्शन घेऊनच करिअरची निवड करा.

३]योग्य त्या करिअर च्या दृष्टीने काही अभ्यासक्रमांबद्दल सुचवता येईल का?

आज नोकरीच्या सुरक्षेची हमी राहिलेली नाही. अशा वेळी अभियांत्रिकी क्षेत्रातील मुख्य पदव्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सिव्हिल,मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल हे इंजिनिअरिंग मधले ३ महत्वपूर्ण विषय मानले जातात ज्यामध्ये विद्यार्थ्यांना आपले भवितव्य सुरक्षित करता येईल.इसरो सार्वजनिक क्षेतार्तील कंपन्या आणि उत्पादनाशी संबंधित बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये मेकॅनिकल,इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल इंजिनिअर्स ना चांगल्या संधी उपलब्ध आहेत. ए आय अर्थात आर्टिफिशिअल इंटीलीजेंस कडे भविष्यातील प्रभावी तंत्रज्ञान म्हणून पाहिलं जात. मानवी बुद्धी आणि वर्तनाच यंत्रणांमध्ये अनुकरण करण्यासाठी कम्प्युटर प्रोग्रॅम विकसित करणं म्हणजे ए आय. या क्षेत्रात देखील करीअर कारण योग्य आहे. वाणिज्य आणि विज्ञान शाखांमधील विद्यार्थ्यांना आज त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने असंख्य पर्याय उपलब्ध आहेत.

# आकाश एज्युकेशनचे डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत अभिमानास्पद यश



देशातील आघाडीची टेस्ट प्रिपरेटरी संस्था आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने जाहीर केले आहे की त्यांच्या ११ विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२५ च्या अंतिम टप्प्यात उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकं पटकावली आहेत. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि विश्लेषण कौशल्य वाढवणारी अत्यंत प्रतिष्ठित स्पर्धा म्हणून ओळखली जाते.१९८१ पासून ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन तर्फे आयोजित ही स्पर्धा, चार टप्प्यांमध्ये पार पडते लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा, सामान्य मुलाखत आणि क्रियाशील संशोधन प्रकल्पावर आधारित मुलाखत व मूल्यांकन.या वर्षी AESL चे एकूण ११ विद्यार्थी

लोकरंग

अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचले. चेंबूर येथील आरोन ठक्कर याने सुवर्ण पदक आणि ₹३०००/- ची शिष्यवृत्ती मिळवली, तर नवी मुंबई येथील साक्षी राजेश कोलटे हिने रौप्य पदक व ₹२०००/- ची शिष्यवृत्ती पटकावली. दोघांनीही परीक्षेच्या सर्व चार कठीण टप्प्यांमध्ये उत्तीर्ण होत हे यश संपादन केले आहे.ही स्पर्धा इयत्ता ६वी व ९वी मधील विद्यार्थ्यांसाठी आहे आणि ती मराठी व इंग्रजी माध्यमांतून घेतली जाते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या विज्ञानातील मूलभूत संकल्पना, समज, विश्लेषण आणि प्रत्यक्षात त्याचा उपयोग किती करता येतो यावर भर दिला जातो. AESL ही संस्था

दखल

मेडिकल व इंजिनिअरिंग प्रवेश परीक्षांसाठी, शाळा/ बोर्ड परीक्षा, तसेच IOQM, NSEs, NSO, IMO यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी सर्वसमावेशक मार्गदर्शन पुरवते.

# जयपूरमधील किल्ले आमेर आणि जयगड

जयपूर शहर, गुलाबी शहर म्हणून प्रसिद्ध, राजस्थानची राजधानी आहे आणि विविध आकर्षणांसाठी ओळखले जाते. जयपूरच्या दोलायमान शहरामध्ये शाही भव्यता आणि वास्तुशास्त्रीय भव्यतेपासून ते स्ट्रीट फूड आणि रंगीबेरंगी बाजारपेठांपर्यंत अनेक गोष्टी आहेत. खडकाळ टेकडीवर वसलेला भव्य आमेर किल्ला, जयपूरमधील एक पर्यटन स्थळ आहे. 1592 मध्ये महाराजा मानसिंग यांनी बांधले, आमेर किल्ला लाल वाळूच्या दगडात आणि संगमरवरी बांधण्यात आला होता. हे राजस्थानच्या राजघराण्याचे निवासस्थान होते. किल्ल्याच्या दरवाज्याकडे जाणाऱ्या दगडी वाटेवरून हत्तीवर स्वार व्हा. किल्ल्यावरून मावळत्या सूर्याचे दृश्य मन मोहून टाकणारे आहे. संध्याकाळी, किल्ल्यातील प्रकाश आणि ध्वनी शोचा आनंद घ्या



चला पर्यटनाला

जो राजपूत राजांच्या भव्य आणि भव्यतेच्या कहाण्या सांगते. सुख महलमध्ये संध्याकाळी मनोरंजक नृत्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. शीश महल, दिवान-ए-आम आणि सुख महलला भेट द्यायला विसरू नका. जवळच असलेले माओठा तलाव हे एक आकर्षक वैशिष्ट्य आहे. जयगड किल्ला हा जयपूरकडे दुर्लक्ष करणारा सर्वात प्रेक्षणीय किल्ला आहे. जगातील सर्वात मोठी तोफ मानल्या जाणाऱ्या जैवना तोफेसाठी ती प्रसिद्ध आहे. जयगड किल्ला १७२६ मध्ये सवाई जयसिंग II ने आमेर किल्ल्याच्या संरक्षणासाठी बांधला होता. जयगड हे काटेरी झुडपांनी आच्छादलेल्या टेकड्यांमध्ये उभे आहे आणि मुख्य गेट, डुंगर दरवाजापर्यंत जाणारे खडे रस्ते. हा किल्ला अरवली पर्वत रांगेत चील का तीला (ईगलच्या टेकडी) वर स्थित आहे, माओठा तलाव आणि आमेर किल्ला दिसतो.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# 71 व्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचा भूषण पाटील सुवर्ण पदकाचा मानकरी

**भिवंडी दि.२३ प्रतिनिधी**

भिवंडी तालुक्यातील ओवळी गावातील अलका किसन पाटील यांचे सुपुत्र भूषण पाटील यांनी नुकत्याच पार पडलेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेतील ७१ व्या राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावला आहे. भूषण पाटील यांनी ठाणे जिल्हा हौशी शरीर सौष्ठव संघटना ठाणे - महाराष्ट्र चे अध्यक्ष कमलाकर केशव पाटील,चेयरमेन बोर्ड पंच संतोष मलबारी यांच्या नेतृत्वाखाली सदर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.तसेच शरीर सौष्ठव पटू पाटील यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये ३ सुवर्ण पदक, राज्य स्तरीय स्पर्धेत ४ सुवर्ण तसेच राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये "महाराष्ट्र श्री" किताब ३ वेळा नावे केला आहे. यासह सरपंच श्री,इम्पैक्ट श्री, व अलीबाग श्री या राज्य स्तरीय स्पर्धाचा समाविष्ट आहे.दरम्यान भूषण पाटील यांनी २०२५ या वर्षात एकूण ९ सुवर्ण पदके पटकावली आहेत.





तर ३ राज्य स्तरीय किताब, राष्ट्रीय स्तरावारिल २ स्पर्धेमध्ये आणि रॉक क्लासिस मधे १ सुवर्ण पदक तसेच "मोस्ट इंप्रु प्लेयर ऑफ़ ईयर २०२५", (आयएफबीएफ) राष्ट्रीय स्पर्धा भारत श्री.२०२५ मध्ये १ सुवर्ण पदक"प्राप्त केले आहे.तर तब्बल १२ वर्षा नंतर भिवंडीला हा मान प्राप्त झाला असून यासाठी रिज़वान फरीद सरांसह प्रतीक दरने(उरन) व प्रसाद लोखंडे (ठाणे) यांच्याकडून मोलाचे मार्गदर्शन लाभले. आणि अपोलो जिमचे प्रवीण म्हात्रे यांचेही मार्गदर्शन त्यांना मदतीचे ठरले. भूषण पाटीलची सदरची कामगिरी बॉडी बिल्डिंग असोसिएशन भिवंडी तालुका, ठाणे जिल्हा व महाराष्ट्र राज्यासाठी एक अभिमानाची व गौरवाची असून त्यासाठी भूषण पाटील यांचे ठाणे जिल्ह्यासह भिवंडी तालुक्यातून अभिनंदन केले जात असून त्यांना पुढ़ील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# 42 हजार हज यात्रेकरूंची मक्का यात्रा अधांतरी; रिजिजूंना मदतीसाठी साकडे

**नवी दिल्ली दि. २३ वृत्तसंस्था**

देशातील ४२,००० हज यात्रेकरू खाजगी टूर ऑपरेटर्समुळे अडचणीत सापडल्याने मुस्लिम समुदायात अस्वस्थता निर्माण झाल्याचे म्हणत, भाजपाचे राष्ट्रीय अल्पसंख्याक मोर्चाचे पदाधिकारी जमाल सिद्दीकी यांनी केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरण रिजिजू यांना या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे.

जमाल सिद्दीकी यांना अखिल भारतीय उलेमा आणि मशैख बोर्डाकडून या प्रकरणी निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात म्हटले होते की, "४ ते ९ जून दरम्यान खाजगी ऑपरेटरद्वारे मक्काला जाण्याचा पर्याय निवडलेल्या ५२,५०७ यात्रेकरूंपैकी फक्त १०,००० यात्रेकरूचीच नोंदणी करण्यात आली आहे."

यानंतर खाजगी टूर ऑपरेटर्सवर कारवाईची मागणी करत सिद्दीकी यांनी रिजिजू यांना एक पत्र लिहिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, "२०२५ च्या हज यात्रेसाठी, खाजगी टूर ऑपरेटर्सना ५२,५०७ जागांचा कोटा मिळाला होता. परंतु त्यांच्या निष्काळजीपणा आणि अक्षमतेमुळे, सौदी सरकारने हा कोटा रद्द केला होता. पण, तुमच्या प्रयत्नांनंतर, फक्त १०,००० जागांचा कोटा पुन्हा मिळू शकला."

"अशा धार्मिक कार्याशी संबंधित निष्काळजीपणासाठी, खाजगी टूर ऑपरेटर्सचा कोटा कायमचा रद्द करावा आणि तो हज समितीला देण्यात यावा. यासाठी जबाबदार खाजगी टूर ऑपरेटर्सना काळ्या यादीत टाकण्याबरोबरच दंडही ठोठावावा", असे सिद्दीकी यांनी पत्रात पुढे म्हटले आहे.

या प्रकरणाची माहिती असलेल्या एका वरिष्ठ भाजपा नेत्याने सांगितले की, "सौदी अरेबिया सरकार चालवत असलेल्या ऑनलाइन पोर्टल, NUSUK द्वारे हज यात्रेची पूर्व प्रक्रिया राबवली जाते. पण आता याची प्रक्रिया बंद झाल्याने ते यात्रेकरूंचे अर्ज स्वीकारत नाहीत. यामुळे प्रवासाची व्यवस्था करूनही ४२,००० हून अधिक यात्रेकरू अडचणीत सापडले आहेत."

# हार्वर्डमधील भारतीय व विदेशी विद्यार्थ्यांसाठी 6 अटींच्या पूर्ततेसाठी 72 तासांची मुदत

**वॉशिंग्टन, दि. २३ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या काही दिवसांपासून निर्णयांचा धडाका लावला आहे. ट्रम्प यांनी घेतलेल्या निर्णयांमध्ये प्रामुख्याने बेकायदेशीर स्थलांतरितांचा मुद्दा, नवीन टॅरिफ धोरण (आयात शुल्क) आणि अमेरिकेतील कर्मचारी कपातीच्या निर्णयानंतर आता आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास हार्वर्ड विद्यापीठावर बंदी अशा अनेक निर्णयांचा समावेश आहे. खरं तर ट्रम्प यांच्या निर्णयांचा जगभरातील अनेक देशांना फटका बसला आहे. यानंतर आता ट्रम्प यांच्या निर्णयांचा फटका हार्वर्डमध्ये शिक्षण घेणाऱ्या भारतासह विदेशातील विद्यार्थ्यांना बसला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने गुरुवारी राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंता आणि कॅम्पसमधील कथित गैरवर्तनाचे कारण देत हार्वर्ड विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी असलेले प्रमाणपत्र रद्द केले. यानंतर आता या निर्णयामध्ये आणखी एक महत्वाची माहिती समोर आली आहे. हार्वर्डमधील भारतीय व विदेशी विद्यार्थ्यांसाठी ६ अटींच्या पूर्ततेसाठी ७२ तासांची मुदत देण्यात आली आहे. या अटींची पूर्तता जर केली नाही तर अनेक विद्यार्थ्यांना अमेरिका सोडावी लागू शकते.

दरम्यान, हार्वर्ड विद्यापीठाकडून परदेशी विद्यार्थ्यांची नोंदणी रद्द केल्यानंतर हजारो भारतीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचं भवितव्य अडचणीत आलं आहे. आता ट्रम्प प्रशासनाने ७२ तासांची मुदत दिली असून या वेळेत डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटीने हार्वर्डला विदेशी विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश देण्यासाठी ६ कठोर अटींचं पालन करण्यास सांगितलं आहे. स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर प्रोग्राम प्रमाणपत्र रद्द झाल्यानंतर हार्वर्ड विद्यापीठ आता F-१ किंवा J-१ व्हिसावर विदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ शकत नाही. त्यामुळे तब्बल ६८०० आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचं करिअर अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामध्ये ८०० विद्यार्थी भारतातील असल्याचं सांगितलं जात आहे.

महासागर NASHIK

Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक

मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**